*For Private Circulation Only*

# Study Circle Career Development Institute

## मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयातील

# सहायक मर्यादित विभागीय परीक्षा कोर्स

## मंत्रालयातील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक–टंकलेखक या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची सहायक पदावर निवड

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : एलटीडी-३४१७/सीआर-१४/२०१७/जाहिरात** **जाहिरात क्रमांक : ३२/२०२३**

## सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३

मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचा-यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **शनिवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०२३** रोजी सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०२३ फक्त **मुंबई** येथे संगणक प्रणालीवर आधारित पद्धतीने आयोजित करण्यात येईल.

**३.** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील पदांचा व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**३.१** वेतनश्रेणी :- S-१४ : ३८६००-१२२८००

**३.२** पदसंख्या :- **मंत्रालयीन विभाग — एकूण ४७ पदे** (एकूण पदांपैकी ०२ पदे दिव्यांग व्यक्तींकरीता आरक्षित आहेत)

(एक) १ पद अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured)/ शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)

(दोन) १ पद- स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व

**३.३** वर नमूद पदसंख्येमध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**३.४** मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून गुणवत्तेनुसार पदे भरण्यात येतील.

CIRCLE

**६. परीक्षा योजना :-**

**६.१ परीक्षेचे टप्पे :- एक - लेखी परीक्षा**

**६.२ परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी**

**६.३ प्रश्नपत्रिका :- दोन**

**६.४ एकूण गुण :- २००**

**६.५** लेखी परीक्षेची परीक्षा योजना व सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ' **उमेदवारांना सूचना** ' अंतर्गत " **अभ्यासक्रम** " **या** सदरामध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

**६.६** लेखी परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**७. निवडप्रक्रिया :-**

**७.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**७.२** सेवा भरतीची संपूर्ण प्रक्रिया सहायक कक्ष अधिकारी (सेवाप्रवेश) नियम, २०१८, सहायक कक्ष अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) पदावर निवडीने नियुक्ती मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा नियम २०२२ अथवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणा-या सुधारणा तसेच आयोगाकडून वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार राबविण्यात येईल .

**७.३** भरती प्रक्रियेदरम्यान अंतिम शिफारस यादी/निवड यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचे क्रमांकन/प्राधान्य क्रमवारी(Ranking) आयोगाच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार निश्चित करण्यात येईल.

**मंत्रालयातील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक - टंकलेखक या लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची सहायक पदावर निवडीद्वारे नियुक्ती करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेची सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम.**

**परीक्षेचे टप्पे :-** लेखी परीक्षा - २०० गुण, लेखी परीक्षेच्या गुणांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येईल.
**परीक्षा केंद्र :-** प्रस्तुत परीक्षा फक्त मुंबई केंद्रावर घेण्यात येईल.

## -: परीक्षा योजना :-

<table>
<tr><th>प्रश्नपत्रिका क्रमांक</th><th>विषय</th><th>दर्जा</th><th>माध्यम</th><th>प्रश्नसंख्या व गुण</th><th>कालावधी</th><th>परीक्षेचे स्वरुप</th></tr>
<tr><td rowspan="3">पेपर — १<br>(०८८)</td><td>इंग्रजी</td><td>बारावी</td><td>इंग्रजी</td><td rowspan="3">१००</td><td rowspan="3">एक तास</td><td rowspan="3">वस्तुनिष्ठ बहुपर्यायी</td></tr>
<tr><td>मराठी</td><td>बारावी</td><td rowspan="2">मराठी</td></tr>
<tr><td>सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधीत बाबी</td><td>--</td></tr>
<tr><td>पेपर - २</td><td>कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पध्दती</td><td>-</td><td>मराठी</td><td>१००</td><td>एक तास</td><td>वस्तुनिष्ठ बहुपर्यायी</td></tr>
</table>

## -: अभ्यासक्रम :-

### प्रश्नपत्रिका - १

| विषय | गुण |
|---|---|
| (१) **मराठी** :- व्याकरण, शुध्दलेखन व विरामचिन्हे यांचे नियम, शब्दांच्या जाती (प्रकार), काळ व अर्थ, वाक्यप्रकार, शब्दसिध्दी, पारिभाषिक शब्द, म्हणींचा अर्थ व उपयोग, वाक्प्रचारांचा अर्थ व उपयोग. | २५ |
| (२) **इंग्रजी** :- Common vocabulary, Sentence structure, Grammar, Comprehension of passage. | २५ |
| (३) **शासकीय योजना व शासनाशी संबंधीत बाबी** :- विभागाच्या महत्त्वाच्या योजना, योजनांची नावे, अनुदान मर्यादा, केंद्र-राज्य हिस्सा लाभार्थी पात्रता, इ. | २५ |
| (४) **सामान्य ज्ञान** :- इतिहास, भूगोल, कला, क्रिडा, साहित्य, पुरस्कार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम-२००५, राज्य शास्त्र, इ. | २५ |
| **प्रश्नपत्रिका - १ ची एकूण प्रश्नसंख्या व गुण** | १०० |

**प्रश्नपत्रिका-२**

**मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचा-यांनी विभाग-अ आणि विभाग-ब सोडविणे आवश्यक आहे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचा-यांनी विभाग-अ आणि विभाग-क सोडविणे आवश्यक आहे.**

| **विभाग - अ: मंत्रालय व आयोग यांच्या सामायिक कामकाजाविषयीचे घटक :-(९०६)** | **गुण** |
|---|---|
| (१) **भारताचे संविधान** - मूलभूत अधिकार (अनुच्छेद १२ ते ३०)<br>राज्य धोरणाची निर्देशक तत्वे (अनुच्छेद ३६ ते ५१)<br>मूलभूत कर्तव्ये (अनुच्छेद -५१ (क) ) | २५ |
| (२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ | २५ |
| (३) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ नियम क्र. ९ ते २०, २७, ३१ ते ४५, ४७. | २५ |
| **विभाग - अ ची एकूण प्रश्नसंख्या व गुण** | ७५ |

| **विभाग - ब: फक्त मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक :- (९०७)** | **गुण** |
|---|---|
| (१) मंत्रालयातील कार्यालयीन पध्दतींची नियमपुस्तिका. | १० |
| (२) **अ.** मंत्रालयातील कामकाजविषयक नियम व त्यासंबंधीच्या सूचना.<br>**ब.** प्रशासकीय सुधारणा व कल्याणकारी धोरणे या संबंधात अंमलबजावणीसाठीचे शासनाचे धोरण / वेळोवेळी शासनाने घेतलेले निर्णय. | ०५ |
| (३) **विधीमंडळ कामकाज :-**<br>**(३.१) विधानसभा नियम-** नियम क्रमांक ६८, ६९, ७०, ७२, ७४ [प्रश्न], ८६ [अल्प मुदतीच्या नोटीसीचे प्रश्न], ९० [पुरवणी प्रश्न], ९२, ९४ [अर्धातास चर्चा], १०१ ते १०३ [अल्पवेळ चर्चा], १०६ ते ११० [ठराव], १९८ व १९९ [संयुक्त समित्या], २०६ व २०७ [लोकलेखा समिती], २०८ ते २१० [अंदाज समिती], २२६ ते २२८ [आश्वासन समिती].<br>**(३.२) विधान परिषद नियम** - नियम क्रमांक ६६, ६७, ६८, ७०, ७२ [प्रश्न], ८४ [अल्पसूचना प्रश्न], ८८ [पुरवणी प्रश्न], ९०, ९२ [अर्धा तास चर्चा], ९७ ते ९९ [अल्पकालीन चर्चा], १०२ ते १०६ [ठराव]. | ०५ |
| (४) **भारताचे संविधान** - भाग - ६ मधील प्रकरण १ ते ४ [अनुच्छेद १५२ ते २१३] | ५ |
| **विभाग - ब ची एकूण प्रश्नसंख्या व गुण** | २५ |

**किंवा**

| **विभाग - क: फक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक (९०८)** | **गुण** |
|---|---|
| (१) भारताच्या संविधानातील लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद ३१५ ते ३२३ | ०५ |
| (२) अ. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील कार्यालयीन कार्यपध्दती.<br>ब. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, १९७१. | १० |
| (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग व शासन दरम्यानच्या पत्रव्यवहार करण्याविषयीच्या कार्यपध्दती व त्यासंबंधीच्या सूचना.<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्य नियमावली (Rules of Procedure) | ०५ |
| (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल. | ०५ |
| **विभाग - क ची एकूण प्रश्नसंख्या व गुण** | २५ |

## मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयातील

# सहायक मर्यादित विभागीय परीक्षा

**१) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २०११**
**२) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २०१२**
**३) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २३ फेब्रुवारी २०१४**
**४) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा ५ डिसेंबर २०१४**
**५) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा ३१ जानेवारी २०१६**
**६) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २७ नोव्हेंबर २०१६**
**७) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २०१७**
**८) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २०१९**
**९) सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा २०२२**

✼ सदर लेखी परीक्षा २०० गुणांची व दोन पेपरची असेल.

**१) पेपर (१) –**
१) मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी (१२ वी दर्जा)

**२) पेपर (२) –**
२) कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

✼ **प्रश्न व गुणसंख्या** – १००

## १) प्रश्नपत्रिका–१ (१०० प्रश्न, १०० गुण)

१) मराठी
२) इंग्रजी
३) योजना व शासन
४) सामान्यज्ञान

**(१) मराठी (२५ प्रश्न व गुण) :** व्याकरण, शुद्धलेखन व विरामचिन्हे यांचे नियम, शब्दांच्या जाती (प्रकार), काळ व अर्थ, वाक्यप्रकार, शब्दसिद्धी, पारिभाषिक शब्द, म्हणींचा अर्थ व उपयोग, वाक्प्रचारांचा अर्थ व उपयोग

**(२) इंग्रजी (२५ प्रश्न व गुण) :** Common Vocabulary, Sentence structure, Grammar, Comprehension of passage.

**(३) शासकीय योजना व शासनाशी संबंधित बाबी (२५ प्रश्न व गुण) :** विभागाच्या महत्त्वाच्या योजना, योजनांची नावे, अनुदान मर्यादा, केंद्र–राज्य गिसा, लाभार्थी पातरता, इ.

**(४) सामान्यज्ञान (२५ प्रश्न व गुण) :** इतिहास, भूगोल, कला, क्रीडा, साहित्य, पुरस्कार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम – २००५, राज्यशास्त्र, इ.

# २) प्रश्नपत्रिका – २ (१०० प्रश्न, १०० गुण)

१) भारताचे संविधान
२) महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९
३) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१
४) मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक
५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक

## विभाग – अ : मंत्रालय व आयोग यांच्या सामाईक कामकाजाविषयीचे घटक (७५ प्रश्न, ७५ गुण)

**१) भारताचे संविधान (२५ प्रश्न व गुण) :** मूलभूत अधिकार (कलम १२ ते ३०), राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे (कलम ३६ ते ५१) मूलभूत कर्तव्ये (अनुच्छेद – ५१ (क))

२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ (२५ प्रश्न व गुण)

३) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१. नियम क्र. ९ ते २०, २७, ३१ ते ४५, ४७ (२५ प्रश्न व गुण)

## विभाग– ब : फक्त मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक (२५ प्रश्न, २५ गुण)

**१) मंत्रालयातील कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका (१० प्रश्न, १० गुण)**

**२) मंत्रालयातील कामकाज (५ प्रश्न, ५ गुण) –**

अ) मंत्रालयातील कामकाजविषयक नियम व त्यासंबंधीच्या सूचना

ब) प्रशासकीय सुधारणा वा कल्याणकारी धोरणे यासंबंधात अंमलबजावणीसाठीचे शासनाचे धोरण/वेळोवेळी शासनाने घेतलेले निर्णय.

**३) विधीमंडळ कामकाज (५ प्रश्न, ५ गुण) –**

**अ) विधानसभा नियम –** नियम क्रमांक ६८,६९,७०,७२,७४ (प्रश्न), ८६ (अल्प मुदतीच्या नोटीसीचे प्रश्न), ९० (पुरवणी प्रश्न), ९२,९४ (अर्धतास चर्चा), १०१ ते १०३ (अल्पवेळ चर्चा), १०६ ते ११० (ठराव), १९८ व १९९ (संयुक्त समित्या), २०६ व २०७ (लोकलेखा समिती),२०८ ते २१० (अंदाज समिती), २२६ ते २२८ (आश्वासन समिती).

**ब) विधान परिषद नियम –** नियम क्र. ६६,६७,६८,७०,७२ (प्रश्न), ८४ (अल्पसूचना प्रश्न), ८८ (पुरवणी प्रश्न), ९०,९२ (अर्धातास चर्चा), ९७ ते ९९ (अल्पकालीन चर्चा), १०२ ते १०६ (ठराव)

**४) भारताचे संविधान भाग (५ प्रश्न, ५ गुण) –** भाग ६ मधील प्रकरण १ ते ४ (कलम १५२ ते २१३)

**किंवा**

## विभाग –क : फक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक (२५ प्रश्न, २५ गुण)

१) भारताच्या संविधानातील लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद ३१५ ते ३२३ (५ प्रश्न, ५ गुण)

**२) अ)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील कार्यालयीन कार्यपद्धती (५ प्रश्न, ५ गुण)

**ब)** प्रशासकीय सुधारणा वा कल्याणकारी धोरणे यासंबंधात अंमलबजावणीसाठीचे शासनाचे धोरण/वेळोवेळी शासनाने घेतलेले निर्णय (२० प्रश्न, ४० गुण) (५ प्रश्न, ५ गुण)

**३)** महाराष्ट्र लोकसेवा आयोग व शासन दरम्यानच्या पत्रव्यवहार करण्याविषयीच्या कार्यपद्धती व त्यासंबंधीच्या सूचना. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्य नियमावली (५ प्रश्न, ५ गुण)

**४)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल. (५ प्रश्न, ५ गुण)

Study Circle

## १) प्रश्नपत्रिका–१ (१०० प्रश्न, १०० गुण)

**१) मराठी –**

**२) इंग्रजी -**

**३) योजना व शासन –**

विभागाच्या महत्त्वाच्या योजना व नावे
अनुदान मर्यादा व केंद्र–राज्य हिस्सा
लाभार्थी पात्रता

**४) सामान्यज्ञान –**

इतिहास
भूगोल
राज्यशास्त्र
चालू घडामोडी – कला, क्रीडा, साहित्य, पुरस्कार
माहिती अधिकार अधिनियम २००५

## २) प्रश्नपत्रिका –२ (१०० प्रश्न, १०० गुण)

**१) भारताचे संविधान –**

मूलभूत अधिकार
राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे
मूलभूत कर्तव्ये

**२) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ –**

**३) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ –**

**४) मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक –**

१) मंत्रालय कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका
२) मंत्रालयातील कामकाज नियम
३) विधीमंडळ कामकाज
४) भारताचे संविधान भाग

**५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक –**

१) लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद
२) आयोगातील कार्यालयीन कार्यपद्धती व निर्णय
३) आयोग व शासन दरम्यान पत्रव्यवहार
४) आयोगाच्या अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल

# सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा

## प्रश्नपत्रिका –१ : मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान, योजना व शासनाशी संबंधित बाबी

| *घटक व उपघटक* | *२०११* | *२०१२* | *२०१४* | *२०१४* | *२०१६* | *२०१६* | *२०१७* | *२०१९* | *२०२२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) मराठी –** | **१०८** | **१०७** | **१०६** | **१०७** | **२५** | **२५** | **२५** | **२५** | **२५** |
| १) सर्वसामान्य शब्दसंग्रह | ३१ | २३ | ३२ | ३२ | ५ | ६ | ६ | ५ | ९ |
| २) वाक्यरचना | १९ | २१ | १४ | १६ | ४ | ५ | ४ | ३ | ३ |
| ३) व्याकरण | ३४ | ३७ | ४३ | ४९ | १४ | ५ | ६ | ९ | ७ |
| ४) म्हणी व वाक्प्रचार | १९ | २० | १२ | ५ | २ | ४ | ४ | ४ | १ |
| ५) उताऱ्यावरील प्रश्न | ५ | ६ | ५ | ५ | – | ५ | ५ | ५ | ५ |
| **(२) इंग्रजी –** | **३३** | **२९** | **३२** | **२५** | **२५** | **२५** | **२५** | **२५** | **२५** |
| 1) Common Vocabulary | १४ | १० | १४ | १० | ३ | ३ | ४ | १ | ५ |
| 2) Sentence structure | ६ | ४ | ६ | १ | ८ | १२ | १४ | ७ | ६ |
| 3) Grammar | ४ | ४ | १ | ३ | ७ | ४ | २ | ९ | ७ |
| 4) Idioms-phrases | ४ | ५ | ६ | ६ | २ | १ | – | 3 | 2 |
| 5) Comprehension | ५ | ६ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| **(३) योजना व शासन –** | **–** | **–** | **२** | **१** | **२३** | **२५** | **२५** | **२५** | **२५** |
| १) योजना : पायाभूत संरचना | – | – | २ | १ | १० | ८ | ८ | ११ | ५ |
| २) अनुदान, केंद्रराज्य हिस्सा | – | – | – | – | ३ | ७ | ७ | ५ | ४ |
| ३) लाभार्थी पात्रता | – | – | – | – | ४ | ४ | ४ | २ | १० |
| **४)** सामाजिक क्षेत्र | – | – | – | – | ६ | ६ | ६ | ७ | ६ |
| **(४) सामान्यज्ञान –** | **९** | **१४** | **१०** | **१७** | **२७** | **२५** | **२५** | **२५** | **२५** |
| १) इतिहास | – | – | – | – | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| २) भूगोल | – | – | – | – | ६ | ५ | ५ | ५ | ४ |
| ३) राज्यशास्त्र | ३ | ६ | ६ | ९ | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ४) चालू घडामोडी | – | – | – | – | ६ | ५ | ५ | ५ | ४ |
| ५) माहिती अधिकार २००५ | – | – | – | – | ५ | ५ | ५ | ५ | ५ |
| ✲ शासकीय कामकाज | ६ | ८ | ४ | ८ | – | – | – | – | – |
| *एकूण* | *१५०* | *१५०* | *१५०* | *१५०* | *१००* | *१००* | *१००* | *१००* | *१००* |

# सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा

## प्रश्नपत्रिका – २ : एमपीएससी/मंत्रालय येथील कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

| | *घटक व उपघटक* | *२०११* | *२०१२* | *२०१४* | *२०१४* | *२०१६* | *२०१६* | *२०१७* | *२०१९* | *२०२२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **भारताचे संविधान –** | | | | | | | | | |
| १) | मूलभूत अधिकार (कलम १२ ते ३०) | १५ | १२ | १३ | १२ | १७ | १४ | १७ | १५ | १५ |
| २) | मार्गदर्शक तत्त्वे (कलम ३६ ते ५१) ) | ७ | १० | १० | ११ | ८ | ६ | ६ | ८ | ७ |
| ३) | मूलभूत कर्तव्ये – कलम ५१ (क) ) | ३ | २ | २ | २ | – | ५ | २ | २ | ३ |
| | **महाराष्ट्र नागरी सेवा नियम –** | | | | | | | | | |
| ४) | म. नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ | २६ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ५) | म. नागरी सेवा (सेवाशर्ती) नियम १९८१ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| | **मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक –** | | | | | | | | | |
| ६) | संविधान भाग ६ – प्रकरण १ ते ४ | १० | १२ | १० | १२ | ५ | ५ | ५ | ६ | ८ |
| ७) | विधीमंडळ कामकाज | २५ | २७ | २८ | २७ | ६ | ६ | ६ | ५ | ५ |
| ८) | प्रशासकीय सुधारणा/कल्याणकारी धोरणे | १५ | १४ | १० | १८ | ४ | ४ | ३ | ३ | २ |
| ९) | मंत्रालयातील कामकाज नियम व सूचना | १३ | ११ | ९ | ७ | ४ | ६ | ७ | ६ | ६ |
| १०) | कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका | ११ | १० | १८ | ११ | ६ | ४ | ४ | ५ | ४ |
| | **महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक –** | | | | | | | | | |
| ११) | संविधानातील आयोगासंबंधीची कलमे | १२ | – | ८ | – | ४ | ५ | ७ | ९ | ५ |
| १२) | एमपीएससी सेवा विनियम,१९७१ | ७ | – | १८ | – | ३ | ४ | ४ | ३ | ४ |
| १३) | एमपीएससीतील कार्यालयीन कार्यपद्धती | १३ | – | ७ | – | ३ | ३ | ४ | ४ | ६ |
| १४) | एमपीएससी पत्रव्यवहार /कार्यनियमावली | २७ | २ | २६ | – | २ | ३ | २ | १ | ६ |
| १५) | एमपीएससीच्या अधिसूचना, जाहिराती | १६ | – | १६ | – | १३ | १० | ८ | ८ | ४ |
| | *एकूण* | *२२५* | *१५०* | *२२५* | *१५०* | *१२५* | *१२५* | *१२५* | *१२५* | *१२५* |

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा पेपर-१, ६ मार्च २०२२ (ए)

# मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान, योजना व शासनाशी संबंधित बाबी

१) सर्वसामान्य शब्दसंग्रह
२) वाक्यरचना
३) व्याकरण
४) म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग
५) उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे
6) **Common Vocabulary**
7) **Sentence structure**
8) **Grammar**
9) **Use of Idioms and phrases & their meaning**
10) **Comprehension of passage**
११) योजना व शासन : पायाभूत संरचना
१२) अनुदान, केंद्रराज्य हिस्सा
१३) लाभार्थी पात्रता
१४) सामाजिक क्षेत्र
१६) इतिहास
१७) भूगोल
१८) राज्यशास्त्र
१९) चालू घडामोडी
२०) माहिती अधिकार २००५

Study CIRCLE

## (१) सर्वसामान्य शब्दसंग्रह

१) दिलेल्या पर्यायापैकी 'फारसी व मराठी' अशा दोन भाषांतील शब्द एकत्र येऊन तयार झालेल्या सामासिक शब्दांचा योग्य पर्याय निवडा.

अ) बाजारहाट  ब) खर्चवेच  क) धनदौलत  ड) रीतरिवाज

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि क बरोबर बाकी चूक  २) फक्त ड आणि ब बरोबर बाकी चूक
३) फक्त ब आणि क बरोबर बाकी चूक  ४) वरीलपैकी सर्व बरोबर

२) 'हापूस' हा शब्द कोणत्या परदेशी शब्द प्रकारातील आहे?

१) फारसी  २) पोर्तुगीज  ३) अरबी  ४) इंग्रजी

३) दिलेल्या पर्यायापैकी लेखन नियमानुसार योग्य शब्द कोणता, ते सांगा.

अ) पूर्वपिठीका ब) पूर्वपिठिका क) पूर्वपीठिका ड) पूर्वपीठीका

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त क बरोबर २) फक्त ड बरोबर ३) फक्त ब बरोबर ४) फक्त अ बरोबर

४) लेखन नियमानुसार चुकीचा शब्द कोणता?

अ) पोशाख ब) खाऊन क) उहापोह ड) प्रावीण्य

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ड २) फक्त क ३) फक्त ब ४) फक्त अ

५) योग्य जोड्या जुळवा :

| क गट | ख गट |
|---|---|
| अ) शब्दातीत | i) आध्यात्मिक, आधिभौतिकी, आधिदैविक अशा तीन प्रकारच्या पीडा |
| ब) सव्यसाची | ii) दोन्ही हातांनी सारख्या कौशल्याने काम करणारा |
| क) तापत्रय | iii) ज्याचे वर्णन करणे शब्दांना शक्य नाही |
| ड) पुनरुक्ती | iv) एकच शब्द पुन्हा पुन्हा वापरणे |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | iii | ii | i |
| २) | iv | ii | iii | i |
| ३) | iii | i | ii | iv |
| ४) | iii | ii | i | iv |

६) पुढीलपैकी अभ्यस्त शब्द कोणता?

१) आईबाप २) गारीगार ३) बिनधोक ४) बेधडक

७) दिलेल्या पर्यायातून देशी शब्द ओळखा.

१) सामान २) सासू ३) झोप ४) कोवळा

८) खालीलपैकी कोणते शब्द, सिद्ध शब्द नाहीत?

अ) जा, ये ब) कर, खा क) दे, घे ड) हरणे, बसणे

**पर्यायी उत्तरे :**

१) अ, ब आणि क बरोबर बाकी सर्व चूक २) फक्त ड बरोबर बाकी सर्व चूक

३) फक्त अ आणि ब बरोबर बाकी सर्व चूक ४) फक्त ब आणि क बरोबर बाकी सर्व चूक

९) 'ऐनवेळ' हा शब्द खालीलपैकी कोणत्या शब्द प्रकाराचे उदाहरण आहे?

१) संस्कृत उपसर्ग घटित २) मराठी उपसर्ग घटित

३) फारशी उपसर्ग घटित ४) यापैकी नाही

Study CIRCLE

## २) वाक्यरचना

१) शाहिरी वाङ्मयात शृंगाररस भरपूर आहे आणि वीररसही तुडुंब भरलेला आहे.
या वाक्यातील विधेय विस्तार कोणता, ते सांगा.

अ) तुडुंब   ब) शृंगाररस   क) भरपूर   ड) शाहिरी वाङ्मय

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त ब   २) फक्त अ   ३) फक्त ड   ४) फक्त क

२) विधानार्थी वाक्याचे प्रश्नार्थक वाक्यात रूपांतर करा.
''आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या देशाला विसरणार नाही.''

१) देश कायमच स्मरणात राहील?
२) आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या देशाला कसे आठवणीत ठेवू?
३) आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या देशाला कसे विसरू?
४) आम्ही कुठेही गेलो तरी आमच्या देशाला हृदयात ठेवू?

३) प्रयोगासंदर्भात खालील विधाने वाचा व दिलेल्या पर्यायातून अचूक विधानाचा पर्याय निवडा.

अ) नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदांशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जाते त्यास प्रयोग असे म्हणतात.
ब) कर्मणी प्रयोगात सकर्मक व अकर्मक असे प्रकार नाहीत.
क) मिश्र किंवा संकर प्रयोगात कर्म-कर्तृ संकर प्रयोग नाही.
ड) अकर्मक शक्यार्थक क्रियापदांचा नेहमीच भावे प्रयोग होतो.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि ब बरोबर   २) फक्त क आणि ड बरोबर
३) अ, ब आणि ड बरोबर   ४) ब, क आणि ड बरोबर

## ३) व्याकरण

१) खालील विधाने वाचा :
दिलेल्या पर्यायापैकी अचूक विधानाचा पर्याय निवडा.

अ) 'ई'कारान्त कुलनामेही सहसा सामान्यरूप होताना बदलत नाही.
ब) 'ऊ'कारान्त कुलनामांचे सहसा सामान्यरूप मूळ नामच राहते.
क) 'ए'कारान्त नपुंसकलिंगी ग्रामनामाचे सामान्यरूप बदलत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि क बरोबर बाकी चूक   २) फक्त ब आणि क बरोबर बाकी चूक
३) फक्त अ आणि ड बरोबर बाकी चूक   ४) फक्त अ आणि ब बरोबर बाकी चूक

२) पुढील वर्णांपैकी कोणता वर्ण मराठीत 'अर्धस्वर' ***नाही?***

१) 'म्' वर्ण   २) 'र्' वर्ण   ३) 'ल्' वर्ण   ४) 'अ' वर्ण

३) ''हंसे मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनी
हाकांनी नभ भरीले जाय सुरांच्या निनाद तो कानी''
प्रस्तुत काव्यपंक्ती अतिशयोक्ती अलंकाराच्या कोणत्या प्रकारातील आहे?
१) भेदकातिशयोक्ती २) विपर्यताशियोक्ती ३) रूपकातिशयोक्ती ४) यद्यर्थातिशयोक्ती

४) दिलेल्या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.
आज दिवसभर सारखे गडगडते.
१) उभयविध २) सकर्मक ३) द्विकर्मक ४) भावकर्तृक

५) 'विद्यार्थी प्रामाणिक आहे' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार कोणता?
१) शक्य क्रियापद २) सकर्मक क्रियापद ३) अकर्मक क्रियापद ४) द्विकर्मक क्रियापद

६) 'स्वार्थ, आज्ञार्थ, विध्यर्थ व संकेतार्थ' हे चार प्रकार कोणत्या शब्दजातीचे आहेत?
१) नाम २) सर्वनाम ३) विशेषण ४) क्रियापद

७) योग्य जोड्या जुळवा :
अ) प्रजा + ऐक्य – प्रजैक्य ब) देवी + ऐश्वर्य – दैव्येश्वर्य
क) गो + ईश्वर – गवीश्वर ड) रंभा + ऊरू – रंभाउर्वशी
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त अ बरोबर बाकी सर्व चूक २) फक्त ब बरोबर बाकी सर्व चूक
३) फक्त अ आणि क बरोबर बाकी सर्व चूक ४) फक्त ड चूक बाकी सर्व बरोबर

## ४) म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग

१) 'षट्कर्णी होणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ दर्शविणारा योग्य पर्याय निवडा.
१) सहा कर्ण असलेला होणे २) सहा जणांनी मिळून एकत्र येणे
३) गुप्त गोष्ट अनेकांना माहीत होणे ४) गुप्त गोष्ट षट्कर्णातून ऐकणे

## ५) उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे

**पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा. त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहा.**

नेहमी समंजसपणे वागणं सोपं नसतं; पण ठरवलं, तर फारसं अवघडही नसतं.

'तो नीट बोलला असता, तर मी हो म्हटलं असतं,' 'त्यानं नीट मागितलं असतं, तर मी दिलंच असतं,' या धोरणात प्रतिसाद नाही, प्रतिक्रिया आहे. समोरच्याचं वागणं बोलणं यावर आपण आपलं वागणं अवलंबून ठेवतो आणि अनेकदा आपण मनाशी आखलेल्या गोष्टी करायचं टाळतो. म्हणजेच केवळ प्रतिक्रिया म्हणून स्वतःचं वागणं बदलतो, स्वतःच्या स्वभावाविरुद्ध वागतो.

'लोक माझ्याशी चांगलं वागले, तरच मी चांगला वागेन,' हा पवित्रा सगळ्यांनीच घेतला, तर प्रथम चांगलं वागायचं कुणी? नाहीतर मग आपणही वाईट वागण्याचा, थोडा कोतेपणा करण्याचा, मन छोटं करण्याचाच पर्याय राहतो. म्हणूनच काही झालं, तरी आपण आपल्या स्वाभाविक शैलीनं वागावं. 'प्रतिक्रिया' म्हणून समोरच्याच्या पातळीवर आपण उतरू नये.

क्वचित एखाद्यावर आपण इतकं संतापतो, की त्याचा अपमान करावा, त्याला काही करून दुखवावं, हे जे मनात येतं, ते तात्पुरतं असतं. ती प्रतिक्रिया असते. तो काही आपला स्वभाव नसतो. जॉन ग्रे म्हणतात, त्याप्रमाणे अशा वेळी आपण तात्पुरतं दुष्ट होण्याचा प्रयत्न करीत असतो.

हा क्षणिक दुष्टाव्याचा मोह टाळता आला पाहिजे. हा मोह टाळता आला नाही, तर आपण त्या व्यक्तीवर या ना त्या प्रकारे सूड उगवण्याची, त्याला धडा शिकवण्याची संधी शोधत राहतो. यातली गोम अशी आहे, की राग, द्वेष हा त्या व्यक्तीबद्दलचा असतो, पण तो धुमसत राहतो आपल्या मनात. म्हणजे त्रास आपल्यालाच होतो.

मनाची शांती तर हरवतेच, पण सगळं महत्त्व दिलं जातं, त्या व्यक्तीला, जी आपल्याला अप्रिय असते, नकोशी असते, आपल्या स्वतःच्या आनंदापेक्षा त्या व्यक्तीला दुखावणं हे जास्त महत्त्वाचं ठरतं.

त्याला दुखावण्यासाठी धडपड करण्यात, त्याला धडा शिकवण्याची संधी शोधण्यात आपला वेळ आणि आपली शक्ती खर्च करण्यापेक्षा आयुष्यात इतर बरंच काही करण्यासारखं असतं, तिकडे लक्ष देणं केव्हाही शहाणपणाचं.

त्यातूनही तुम्ही अगदी कुणावर सूड उगवलात, तर तुम्हांला समाधान मिळतंही; पण तेही तात्पुरतं असतं. सुडाचं समाधान हे खरं समाधान नसतंच. आपण जे काही केलं, ते योग्य होतं का, हा प्रश्न पुढे तुम्हांला आयुष्यभर छळत राहतो.

म्हणून आपण आपल्या 'आतल्या आवाजा'चं ऐकावं. त्याची भाषा सुडाची नसते, प्रेमाचीच असते. ती समजून घ्यावी. आपली माणुसकी, आपला चांगुलपणा सोडू नये.

याचा अर्थ असा नव्हे, की एखाद्यानं आपलं कितीही नुकसान केलं असेल, आपल्याला कितीही दुखावलं असेल, तरी ते मुकाट्यानं सहन करावं. अजिबात नाही. जर आर्थिक व्यवहाराचा प्रश्न असेल, तर त्या संदर्भात आवश्यक ती कारवाई जरूर करावी. तशीच वेळ आली, तर कोर्टातही जावं; पण त्या व्यक्तीबद्दल मनात राग खदखदत ठेवू नये, आकस धरू नये.

ती व्यक्ती पुन्हा आपलं नुकसान करणार नाही, पुन्हा तिच्याकडून आपण दुखावले जाणार नाही, याची जरूर दक्षता घ्यावी. त्या व्यक्तीशी व्यवहार करू नयेत. नको असतील, तर संबंधही ठेवू नयेत. पण मनात व्यक्तिगत वैर बाळगू नये. त्याचं वाईट तर चिंतू नयेच, शक्य असेल, तर भलंच चिंतावं.

तुम्हा म्हणाल, हे इतकं संतकुळीतलं वागणं, तुम्हा-आम्हांला कसं शक्य आहे? जॉन ग्रे यांचं म्हणणं : ''स्वाभाविकपणे वागलं तर हे प्रत्येकाला शक्य आहे. कारण आपला स्वाभाविक कल हा सद्‌भावनेकडेच असतो.''

हे तुम्हांला पटतंय का? विचार करून पाहा. 'देव त्याचं भलं करो', हे शब्द उच्चारणं सोपं वाटतं, की 'देव त्याचं वाटोळं करो,' हे शब्द उच्चारणं सोपं असतं? स्वाभाविक काय वाटतं? कुठले शब्द उच्चारल्यानंतर आपल्याला 'छान' वाटतं? 'फरगेट ॲण्ड फरगिव्ह'या धोरणाचा फायदा का समोरच्या व्यक्तीला जितका होतो, तितकाच, किंबहुना त्याहून अधिक फायदा हा आपल्याला स्वतःला होत असतो.

तुम्ही असं (स्वाभाविक आणि म्हणूनच) छान वागता, तेव्हा पुढचे सगळे अनुचित, त्रासदायक प्रसंग तर टळतातच; पण त्यामुळे तुटलेले, तुटू पाहणारे संबंध पुन्हा जुळून येतात किंबहुना अधिक गहिरे होतात.

१) आपण स्वतःच्या स्वभावाविरुद्ध केव्हा वागतो?

१) केवळ प्रतिक्रिया व्यक्त करतो तेव्हा.
२) केवळ दुखवण्यासाठी बोलत नाही तेव्हा.
३) स्वतःचं वागणं बदलतो तेव्हा.
४) तात्पुरतं असमाधान मिळतं तेव्हा.

२) जॉन ग्रेच्या मते 'आपण तात्पुरतं दुष्ट होण्याचा प्रयत्न केव्हा करतो'?

१) आपण आपल्या स्वभावानुसार वागतो तेव्हा.
२) दुसऱ्याला दुखवावं असं मनात येत तेव्हा.
३) केवळ प्रतिक्रिया देतो तेव्हा.
४) मोह टाळतो तेव्हा.

३) सुडाचं समाधान हे खरं समाधान नसतंच असे का म्हटले आहे.
१) कारण तो प्रश्न आयुष्यभर छळत रहातो.
२) कारण तो आपला बाहेरचा आवाज असतो, तो आपल्याला सूड घ्यायला सांगतो.
३) कारण त्यावेळी आपले वागणे योग्यच असते.
४) कारण त्यात शहाणपणा असतो.

४) आपले स्वाभाविक वागणे कसे असावे?
१) वैर बाळगणारे
२) 'देव त्याचं भलं करो' असे न म्हणणारे
३) सतत बदलणारे
४) सद्भावनेकडे कल असणारे

५) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.
१) संयमाचे वागणे नको रे बाबा!
२) असद्भाव-निजखूण
३) आतला आवाज
४) एकमेका टाळीत जावे!

## 6) Common Vocabulary

1) In the word 'dysentery', the word 'dys' is a :
1) Greek prefix 2) Latin prefix 3) English prefix 4) Can't say

2) Fill in the blanks.
a) She has saved hard and now has ...... money.
b) She is not lonely, for she has ...... friends.
c) He ate ...... number of cakes.
**Answer Options :**
1) little, a few, a large
2) a little, a few, a large
3) little, few, large
4) a little, a few, large

3) Point out the sentence that has the correct spelling.
1) She altimately uttered the truth while dyeing on the death-bed.
2) Copying someone else's idea loses half of its worth.
3) He is wellknown for forgeting everything once his task is over.
4) Nowadays, worshiping God at the public-places is strictly forbiden.

4) Which of the following is / are **not** included in rodents?
a) Rabbits b) Cats c) Mice
**Answer Options :**
1) a and b only 2) b only 3) c only 4) a, b and c

5) Fill in the blank.
It was a ...... occasion.
1) momentful 2) momented 3) momentous 4) movement

## 7) Sentence structure

1) Choose the correct sentence/s.
a) Your hair needs cutting badly.
b) I don't hardly know this girl.
c) One student only came in late yesterday.
**Answer Options :**
1) b only 2) a and c only 3) a, b and c 4) None of the above

2) Point out the sentences which have the correct punctuation and capitals.
a) the ganges, the jamna, the Krishna and the Kaveri should be connected.
b) The tragedy king dilip kumar left behind the legacy of best films.
c) Shakespeare's 'the merchant of venice' is a mature and delightful comedy.
d) most of the nobel laureates are from the united states of america.
**Answer Options :**
1) a, b and c only 2) b, c and d only 3) All of the above 4) None of the above

3) A sage says, " It is divinity that will shape my end."
The correct indirect narration of this sentence is :
1) A sage said that it is divinity that will shape his end.
2) A sage says that it is divinity that will shape his end.
3) A sage said that it was divinity that will shape his end.
4) A sage said that it is divinity that would shape his end.

4) He <u>would rather die than</u> involve in the vulgar and corrupt activities.
The underlined words in this sentence denote ......
1) a wish or desire 2) a choice or preference
3) a polite request 4) a habitual action in the past

5) Fill in the blank.
......, we shall get a reply in two days.
1) If we send a telegram today 2) If we will send a telegram today
3) If we shall send a telegram today 4) If we have sent a telegram today

6) Choose the correct substitute of the following sentence :
Sasikala is not even understanding simple equation !
1) Sasikala don't understand even simple equation !
2) Sasikala does not even understand simple equations !
3) Sasikala hasn't even understanding simple equations !
4) Sasikala cannot understood even simple equations !

## 8) Grammar

1) Fill in the blank.
I ...... England last August.
1) visited 2) have visited 3) had visited 4) visiting

2) a) The sparrows would come into his hut and pick up the crumbs of food from his hand.
b) They must stop saluting a corrupt Tahsildar or a Police Officer.
c) We should respect our parents and good teachers who have shaped our lives.
d) The have to remember the sacrifice of the freedom-fighters forever, and not only on the 15th August.

The above sentences have ......

**Answer Options :**

1) participles 2) infinitives 3) modal auxiliaries 4) principal verbs

3) Point out the sentence which has the ***incorrect*** use of preposition.
1) She was confined with her bed with dengue in the past fortnight.
2) He was afflicted with a deadly disease.
3) God bestows his blessings on those who work hard.
4) This baby never parts with her colourful toys.

4) In the following sentences two main clauses are linked with ......
a) I am an old man so I think I am unfit for Marathon.
b) We reached the hospital in time but the doctor refused to admit the patient.
c) He told us stories from the Mahabharata - besides he cracked some fine jokes.
d) She finally passed the examination though she had many problems.

**Answer Options :**

1) prepositions 2) conjunctions 3) adverbs 4) adjectives

5) Find out the correct form of pronoun to be used in the blank space of the given sentence :
"Either Sita or Amina forgot to take ...... passport."
1) her 2) their 3) them 4) his

6) Identify the compound conjunctions in the given sentence :
"He walks as though he is slightly lame."
1) as 2) as though 3) slightly 4) lame

7) Point out the sentences which do not have proper articles.
a) All human life was engulfed in darkness before invention of electricity.
b) It seems that things have fallen apart and centre of Indian democracy has vanished.
c) We saw setting of Sun in West just before rising of Moon in sky.
d) 'Mother' - Maxim Gorky's novel is on life of factory workmen.

**Answer Options :**

1) a, b and c only 2) b, c and d only 3) All of the above 4) None of the above

## 9) Use of Idioms and phrases & their meaning

1) Match the following :

| | |
|---|---|
| a) Come after | i) Manage to get |
| b) Come by | ii) Chase |
| c) Come round | iii) Arrive |
| d) Come along | iv) Change one's opinion |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| 1) | ii | i | iii | iv |
| 2) | ii | i | iv | iii |
| 3) | i | ii | iii | iv |
| 4) | i | ii | iv | iii |

2) Identify the noun phrase in the given sentence :
"I expect to get a prize."
1) I expect 2) expect to 3) to get a prize 4) expect

## 10) Comprehension of passage

**Read the passage given below carefully and answer the questions that follow :**

A stamp is, to many people, just a slip of paper that takes a letter from one town or country to another. They are unable to understand why we stamp collectors find so much pleasure in collecting them and how we find the time in which to indulge in our hobby. To them it seems a waste of time, a waste of effort and a waste of money. But they do not realise that there are many who do buy stamps, many who find the effort worthwhile and many who, if they did not spend their time collecting stamps, would spend it less profitably. We all seek something to do in our leisure hours and what better occupation is there to keep us out of mischief than that of collecting stamps. An album, a packet of hinges, a new supply of stamps, and the time passes swiftly and pleasantly.

Stamp collecting has no limits and a collection never has an end; countries are always printing and issuing new stamps to celebrate coronations, great events, anniversaries and deaths. And the fascination of collecting is trying to obtain these stamps before one's rivals. Every sphere of stamp collecting has its fascination - receiving letters from distant countries and discovering old stamps in the leaves of dusty old books. A stamp itself has a fascination all it own. Gazing at its little picture we are transported to the wilds of Conge, the homes of the Arabs, and the endless tracks of the Sahara desert. There is a history in a stamp. The ancient Roman Empire and the Constitution of America, India's Independence and the Allied Victory, are all conveyed to our mind's eye by means of stamps. We see famous men - printers, writers, scientists, soldiers, politicians and famous incidents. Stamps so small and minute, contain knowledge that is vast and important.

1) What do many people think about a stamp ?
a) It is just a piece of paper.
b) It takes a letter from one place to another.
c) It contains a history.
**Answer Options :**
1) a and b only 2) b and c only 3) c only 4) a, b and c

2) Stamp-collecting has ......
1) no loss 2) no risk 3) no limits 4) no price

3) What attraction is involved in collecting new stamps ?
1) To obtain them before one's rivals.
2) To obtain them at a cheaper price.
3) To use them for sending letters to one's friends.
4) To sell ehem later at a higher price.

4) We all seek something to do in our ...... time.
1) precious 2) leisure 3) busy 4) duty

## ११) योजना व शासन : पायाभूत संरचना

१) ''मोफत पाणी योजना सुरू करणारे पहिले राज्य, भारतातले पहिले रेबीज मुक्त राज्य, येथील खोला मिर्चीला 'जीआय नामांकन' प्राप्त झाले आहे.'' हे वर्णन खालीलपैकी कोणत्या राज्याशी संबंधित आहे ?
१) महाराष्ट्र २) गोवा ३) केरळ ४) दिल्ली

२) ''अतिविशाल प्रकल्प'' हा संवर्ग कोणत्या प्रकल्प/योजने अंतर्गत येतो ?
१) जलसंपदा प्रकल्प २) जलयुक्त शिवार
३) सामूहिक प्रोत्साहन योजना ४) प्रधान मंत्री आवास योजना

३) सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ .............. प्रशासकीय विभागामार्फत राबविण्यात येते.
१) सामाजिक न्याय विभाग २) महिला व बाल विकास विभाग
३) सार्वजनिक आरोग्य विभाग ४) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

४) केंद्र शासनाच्या सूचनेनुसार ''अमृत अभियान'' राज्यातील ............... शहरांमध्ये राबविण्यात येणार आहे.
१) ५० २) ४५ ३) ४३ ४) ४२

५) आदर्शगांव संकल्प व प्रकल्प योजना कोणत्या प्रशासकीय विभागांतर्गत राबविण्यात येते ?
१) ग्राम विकास विभाग २) आदिवासी विकास विभाग
३) मृद व जलसंधारण विभाग ४) जलसंपदा विभाग

६) राज्याचे ऊर्जा संवर्धन धोरणांतर्गत दरवर्षी ............ ला ''ऊर्जा संवर्धन दिवस'' म्हणून साजरा करण्यात येतो.
१) १५ जानेवारी २) १० डिसेंबर ३) २७ डिसेंबर ४) १४ डिसेंबर

## १२) अनुदान, केंद्रराज्य हिस्सा

१) दीनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत केंद्र व राज्याचा खर्चाचा वाटा किती ?
१) ७५ : २५ २) ६० : ४० ३) ८० : २० ४) ७० : ३०

२) मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजनेअंतर्गंत सर्वसाधारण गटासाठी लाभार्थी हिस्सा किती टक्के आहे ?
१) ५% २) ७% ३) १५% ४) १०%

३) प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा वार्षिक हप्ता किती आहे ?
१) रु.२२० २) रु.२३० ३) रु.३३० ४) रु.१३०

४) खालीलपैकी कोणती योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे ?
१) मुख्यमंत्री कृषी व अन्नप्रक्रिया योजना
२) सामूहिक प्रोत्साहन योजना, २०1३
३) जलयुक्त शिवार अभियान
४) प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना

## १३) लाभार्थी पात्रता

१) राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याअंतर्गत अंत्योदय कुटुंबासाठी दरमहा किती लाभ दिला जातो ?
१) ३५ कि.ग्रॅ. अन्न प्रति कुटुंब प्रतिमाह
२) २५ कि.ग्रॅ. अन्न प्रति कुटुंब प्रतिमाह
३) १५ कि.ग्रॅ. अन्न प्रति कुटुंब प्रतिमाह
४) २० कि.ग्रॅ. अन्न प्रति कुटुंब प्रतिमाह

२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सपाट प्रदेशासाठी किती अर्थसहाय्य दिले जाते ?
१) रु.१,००,००० २) रु.१,५०,००० ३) रु.१,२०,००० ४) रु.१,२५,०००

३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत शेतकऱ्याचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्यास किती नुकसान भरपाई दिली जाते ?
१) रु.१,००,००० २) रु.२,००,००० ३) रु.३,००,००० ४) रु.५०,०००

४) प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत किती विमा संरक्षण दिले जाते ?
१) प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.१,५०,०००
२) प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.३,००,०००
३) प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५,००,०००
४) प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.२,५०,०००

५) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यास ............. निधीचा लाभ अनुज्ञेय आहे.
१) रु.९,००० २) रु.६,००० ३) रु.१०,००० ४) रु.१५,०००

*६) महात्मा फुले जन आरोग्य योजनेत धोरण वर्षात प्रति कुटुंब किती प्रतीपूर्ती अनुज्ञेय केली जाते ?*
*१) रु.२,००,००० २) रु.२,५०,००० ३) रु.१,००,००० ४) रु.३,००,०००*

७) एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत खालील वयोगटातील बालकांना लाभ देण्यात येतो :
१) ०–३ वर्षे २) ०–६ वर्षे ३) ०–५ वर्षे ४) १–६ वर्षे

८) मुख्यमंत्री कृषि व अन्नप्रक्रिया योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी पात्र उद्योग/संस्था यामध्ये कोणत्या घटकांचा समावेश आहे ?
अ) सक्षम शेतकरी उत्पादक कंपनी/गट
ब) खाजगी उद्योग क्षेत्र
क) ग्रामीण बेरोजगार युवक
ड) महिला बचत गट
**पर्यायी उत्तरे** :
१) अ, ब आणि क २) अ, ब आणि ड ३) अ, क आणि ड ४) वरीलपैकी सर्व

९) ''सामूहिक प्रोत्साहन योजना'' २०१३ अंतर्गत विशाल प्रकल्प गटात 'क' वर्गीकृत तालुक्यांकरिता कोणते निकष आहेत?
१) रु.१०० कोटी गुंतवणूक किंवा २५० व्यक्तींना रोजगार
२) रु.५०० कोटी गुंतवणूक किंवा १००० व्यक्तींना रोजगार
३) रु.७५० कोटी गुंतवणूक किंवा १५०० व्यक्तींना रोजगार
४) रु.३५० कोटी गुंतवणूक किंवा ५०० व्यक्तींना रोजगार

१०) मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमांतर्गत लाभ घेणाऱ्या राज्यातील तरुणांचा वयोगट किती असणे आवश्यक आहे ?
१) १८ ते २५ वर्षे   २) २५ ते ३० वर्षे   ३) २१ ते २५ वर्षे   ४) २१ ते ३० वर्षे

## १४) सामाजिक क्षेत्र

१) मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते ?
१) सामान्य प्रशासन विभाग   २) सामाजिक न्याय विभाग
३) कामगार विभाग   ४) महसूल व वन विभाग

२) नवसंजीवन योजना समाजातील कोणत्या घटकासाठी राबविली जाते ?
१) अनुसूचित जाती   २) विमुक्त व भटक्या जमाती
३) आदिवासी   ४) इतर मागास वर्ग

३) क्रीडा क्षेत्रातील विशेष उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महाराष्ट्रातील अपंग खेळाडूला कोणत्या पुरस्काराने गौरविण्यात येते?
१) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार   २) जिल्हा क्रीडा पुरस्कार
३) एकलव्य राज्य क्रीडा पुरस्कार   ४) उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार

४) माझी कन्या भाग्यश्री सुधारित योजना संदर्भात खालीलप्रमाणे कोणते विधान/विधाने चुकीचे आहे ?
अ) मुलींच्या आरोग्याचा दर्जा वाढविणे
ब) लिंग निवडीस प्रतिबंध न करणे
क) मुलींचा जन्मदर वाढविणे
ड) मुलींच्या शिक्षणाबाबत प्रोत्साहन देणे
**पर्यायी उत्तरे** :
१) फक्त अ, क आणि ड   २) फक्त ब   ३) फक्त ब आणि ड   ४) फक्त ड

५) राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा दि. ............ पासून संपूर्ण देशभरात लागू करण्यात आला आहे.
१) २ फेब्रुवारी २००६   २) २३ जानेवारी २०१८
३) १ एप्रिल २०१६   ४) १ नोव्हेंबर २०१६

६) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत एकूण ............. विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तकांची पुरस्कारांची निवड करण्यात येते.
१) ४०   २) २५   ३) ३५   ४) २०

## १६) इतिहास

१) जहालवादी विचारधारेचे खालीलपैकी कोणते नेते होते?

१) दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशा वॉच्छा
२) लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, बाळ गंगाधर टिळक
३) महात्मा गांधी, सरोजिनी नायडू, खान अब्दुल गफार खान
४) स्वा. सावरकर, विष्णू गणेश पिंगळे, चाफेकर बंधू

२) आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण आणि अच्युतराव पटवर्धन यांनी ...... पक्षाची स्थापना केली.

१) राष्ट्रवादी २) समाजवादी ३) हुकुमशाह ४) लोकशाही

३) दलित चळवळीचे मुखपत्र असणारे कोणते वृत्तपत्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केले?

१) प्रभाकर २) गुलामगिरी ३) बहिष्कृत भारत ४) दर्पण

४) पंडित नेहरूंनी कोणाला 'शैतानाचा वकील' म्हणून संबोधिले?

१) क्रिप्स २) थॉमसन ३) जेम्स ४) वॉटसन

५) खालीलपैकी प्रार्थना सभेचे उद्दिष्टे कोणते होते?

अ) समाजाची नैतिक प्रगती घडवून आणणे
ब) जाती व्यवस्थेवर प्रहार
क) राष्ट्रीय जागृतीस प्रेरणा
ड) शुद्धीकरण चळवळ

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि ड २) फक्त ब आणि क ३) फक्त अ ४) फक्त अ आणि ब

## १७) भूगोल

१) बिन जांभी मृदा व अति पर्जन्य कृषी हवामान विभाग कोणत्या जिल्ह्यात आहे?

अ) नाशिक ब) नागपूर क) ठाणे ड) पालघर इ) रायगड

**पर्यायी उत्तरे :**

१) क, ब आणि अ २) क, ड आणि इ ३) अ, ड आणि इ ४) अ, ब, क आणि ड

२) महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणे व त्यांचे जिल्हे यांच्या योग्य जोड्या लावा.

| | |
|---|---|
| अ) पाचगणी | i) सिंधुदुर्ग |
| ब) माथेरान | i) अमरावती |
| क) आंबोली | i) सातारा |
| ड) चिखलदरा | i) रायगड |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| २) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| ३) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| ४) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

३) भारतात दूध उत्पादनास चालना देण्यासाठी दूध महापूर योजना सुरू करण्यात आली, त्याचे मार्गदर्शक ...... होते.
१) ॲलेक्स कुरियन २) तात्यासाहेब कोरे ३) माधव चितळे ४) वर्गीस कुरियन

४) भारतातील दक्षिण रेल्वेचे प्रमुख केंद्र ...... येथे आहे.
१) हैद्राबाद २) त्रिवेंद्रम ३) बंगळुरू ४) चेन्नई

५) अरबी समुद्रातील लक्षद्वीप हे बेटसमुह उत्तरेकडे व दक्षिणेकडे या नावाने ओळखली जातात.
१) करवत्ती व मिनिकॉय २) अमीनदीवी व कन्ननोर ३) नारकोंडम व बॅरन ४) अंदमान व निकोबार

## १८) राज्यशास्त्र

१) भारतीय राज्यघटनेनुसार खालीलपैकी कोणते *मूलभूत कर्तव्य* ***नाही?***
१) सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान करणे.
२) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा विकास करणे.
३) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशांचे मोल जाणून त्याचे जतन करणे.
४) स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे.

२) भारतीय संघराज्याचे स्वरूप खालीलपैकी कशाप्रकारे आहे?
१) एकात्म तसेच प्रबळ केंद्रीकरणात्मक २) घटक राज्यांना अधिक स्वायत्तता देणारे
३) केंद्राकर्षी प्रवृत्तीचे संघराज्य ४) संघराज्यासाठी स्वतंत्र न्यायव्यवस्था असणारे

३) खालीलपैकी भारतीय राज्यघटनेचा कोणता अनुच्छेद घटक राज्याच्या महाधिवक्त्याशी संबंधित आहे?
१) १६४ २) १६५ ३) १७८ ४) १९४

४) खालीलपैकी कोणत्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये नगरपालिकेशी संबंधित तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या?
१) ७२ वा घटनादुरुस्ती कायदा, १९९२ २) ७३ वा घटनादुरुस्ती कायदा १९९३
३) ७४ वा घटनादुरुस्ती कायदा १९९३ ४) ७६ वा घटनादुरुस्ती कायदा, १९९४

५) मूलभूत हक्कांबाबत खालीलपैकी कोणते विधान ***चुकीचे*** आहे?
१) मूळच्या (original) भारतीय राज्यघटनेमध्ये सात प्रकारच्या मूलभूत हक्कांची तरतूद होती.
२) जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या हक्कामध्ये (अनुच्छेद २१) निःशुल्क कायदेशीर मदतीच्या हक्काचा अंतर्भाव होतो.
३) समतेच्या हक्कामुळे राज्याला कोणत्याही विशिष्ट वर्गासाठी खास तरतुदी करण्यास मज्जाव करण्यात आलेला आहे.
४) राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात भारतीय नागरिकांचे मूलभूत हक्क निलंबित होऊ शकतात.

## १९) चालू घडामोडी

१) साहित्यातील नोबेल पुरस्कार २०२० चा विजेता ............. आहे.
१) लुईस ग्लॉक (Louise Gluck) २) रॉजर पेनरोज
३) जेनिफर ए. दौडना ४) मायकेल हॉटन

२) खालील विधाने विचारात घ्या :

अ) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सरचिटणिसांची निवड सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार आमसभेकडून पाच वर्षांसाठी केली जाते.

ब) सुरक्षा परिषदे कडून अशी शिफारस येणे आवश्यक असतेच असे नाही. परंतु सुरक्षा परिषदेमधील पाच कायम सदस्यांपैकी कोणीही नामांकनास नकाराधिकार वापरू शकतो.

क) अँटोनियो गुटरेस हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस म्हणून नुकतेच दुसऱ्या कार्यकाळासाठी निवडले गेले आहेत, जे या पदावर १ जानेवारी २०१७ पासून कार्यरत आहेत.

ड) अँटोनियो गुटरेस यांची संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीसाठी नियुक्ती केली आहे.

वरीलपैकी कोणती विधाने बिनचूक आहेत ?

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त अ, ब आणि क  २) फक्त ब, क आणि ड  ३) फक्त अ आणि क  ४) वरील सर्व

३) कोणत्या प्रकल्पांतर्गत युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (United States of America) मानवाला चंद्रावर उतरवणार आहे ?

१) शटल मिर प्रकल्प (Shuttle Mir Program)

२) अर्टेमिस प्रकल्प (Artemis Program)

३) अपोलो १६ प्रकल्प (Apollo 16 Program)

४) कमर्शिअल क्रु प्रकल्प (Commercial Crew Program)

४) कोणत्या देशातील सैन्याने फेब्रुवारी २०२१ मध्ये बंड करून एक वर्षासाठी आणीबाणी घोषित केली ?

१) व्हिएतनाम  २) थायलंड  ३) भूतान  ४) म्यानमार

## २०) माहिती अधिकार २००५

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये पुढीलपैकी कोणती माहिती मिळविण्याचा अधिकार नागरिकांना आहे ?

अ) कोणतेही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल.

ब) दस्तऐवजाची मायक्रोफिश, आणि प्रतिरूप प्रत.

क) मायक्रोफिल्म मध्ये संग्रहित केलेल्या प्रतिमेची नक्कल (परावर्धित वा अपरावर्धित)

ड) संगणकाद्वारे तयार केलेले साहित्य

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त अ आणि क  २) फक्त ब आणि ड  ३) फक्त ड  ४) वरील सर्व

२) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडून किंवा यशस्थिती, राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडून कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात पोटकलम (१) अन्वये त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी नोटीस मिळाल्याच्या दिनांका पासून ............ दिवसाच्या आत प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यास येईल.

अ) ५ दिवसात  ब) १५ दिवसात  क) ८ दिवसात  ड) १० दिवसात

**पर्यायी उत्तरे** :

१) पर्याय अ योग्य आहे  २) पर्याय ब योग्य आहे  ३) पर्याय क योग्य आहे  ४) पर्याय ड योग्य आहे

३) माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार राज्य माहिती आयोग पुढील व्यक्तींचा बनलेला असतो.

अ) उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती

ब) राज्य मुख्य माहिती आयुक्त

क) आवश्यक असतील त्याप्रमाणे पाचपेक्षा अधिक नसतील इतके माहिती आयुक्त

ड) आवश्यक असतील त्या प्रमाणे दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुक्त

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त अ आणि ब  २) फक्त ब आणि क  ३) फक्त ब आणि ड  ४) फक्त अ आणि क

४) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार ............ च्या अध्यक्षते खाली गठित समितीच्या शिफारशी नुसार केंद्रीय मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.

१) उपराष्ट्रपती  २) पंतप्रधान  ३) भारताचे सर न्यायाधीश  ४) लोकसभा अध्यक्ष

५) राज्य मुख्य माहिती आयुक्त, ज्या दिनांकास आपले पद धारण करील, त्या दिनांका पासून ............ कालावधीसाठी ते पद धारण करील.

**पर्यायी उत्तरे** :

१) पर्याय अ योग्य आहे  २) पर्याय ब योग्य आहे  ३) पर्याय क योग्य आहे  ४) पर्याय ड योग्य आहे

0–0–0

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा पेपर–२, ६ मार्च २०२२ (ए)

# एमपीएससी / मंत्रालय येथील कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

✻ भारताचे संविधान –

१) मूलभूत अधिकार (कलम १२ ते ३०)
२) मार्गदर्शक तत्त्वे (कलम ३६ ते ५१) )
३) मूलभूत कर्तव्ये (कलम ५१ (क) )

✻ महाराष्ट्र नागरी सेवा नियम –

४) म. नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९
५) म. नागरी सेवा (सेवाशर्ती) नियम १९८१

✻ मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक –

६) संविधान भाग ६ – प्रकरण १ ते ४
७) विधीमंडळ कामकाज
८) प्रशासकीय सुधारणा / कल्याणकारी धोरणे
९) मंत्रालयातील कामकाज नियम व सूचना
१०) कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका

✻ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक –

११) संविधानातील आयोगासंबंधीची कलमे
१२) एमपीएससी सेवा विनियम, १९७१
१३) एमपीएससीतील कार्यालयीन कार्यपद्धती
१४) एमपीएससी पत्रव्यवहार / कार्यनियमावली
१५) एमपीएससीच्या अधिसूचना, जाहिराती

## भारताचे संविधान

## १) मूलभूत अधिकार (कलम १२ ते ३०)

१) प्रतिबंधक स्थानबद्धत्ते संदर्भात भारतीय घटनेतील कोणते अनुच्छेद संबंधित आहे ?
  १) अनुच्छेद १९  २) अनुच्छेद २१  ३) अनुच्छेद २२  ४) अनुच्छेद २५

२) अल्पसंख्यांक वर्गाच्या शैक्षणिक हितसंबंधांचे संरक्षणाबाबत भारतीय संविधानातील पुढीलपैकी कोणत्या अनुच्छेदात तरतूद करण्यात आली आहे ?
१) अनुच्छेद २८ २) अनुच्छेद २९ ३) अनुच्छेद १६ ४) अनुच्छेद ३०

३) संविधानाच्या कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे 'मालमत्तेचा हक्क' हा मूलभूत हक्क म्हणून वगळण्यात आला आहे ?
१) ४२ व्या २) ४४ व्या ३) ४६ व्या ४) ४८ व्या

४) भारतीय राज्यघटनेच्या ८६ व्या घटनादुरुस्तीने कोणता अधिकार हा मूलभूत अधिकारापैकी एक अधिकार करण्यात आला आहे ?
१) रोजगार २) शिक्षण ३) शालेय आहार ४) माहिती

५) मूलभूत हक्कांचा संरक्षक खालीलपैकी कोण आहे ?
१) विधिमंडळ २) कार्यकारी मंडळ ३) राजकीय पक्ष ४) न्यायपालिका

६) संविधानाच्या २५ व्या कलमानुसार 'हिंदू' या शब्दोल्लेखात खालीलपैकी कोणत्या धर्माची उपासना करणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे ?
१) फक्त हिंदू
२) फक्त हिदू, जैन व बौद्ध
३) हिंदू, शीख, जैन व बौद्ध
४) वरीलपैकी नाही

*७) डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या एका अनुच्छेदाला ''भारतीय संविधानाचे हृदय आणि आत्मा'' असे म्हटले आहे. खालीलपैकी कोणता मूलभूत हक्क त्यात आहे ?*
*१) स्वातंत्र्याचा अधिकार*
*२) घटनात्मक उपायांचा अधिकार*
*३) प्राथमिक शिक्षणाचा अधिकार*
*४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार*

८) सन २००२ ला ८६ व्या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेमध्ये खालील मूलभूत कर्तव्याचा समावेश करण्यात आला आहे?
१) संविधानाचे पालन करणे आणि राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
२) राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुकरण करणे.
३) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.
४) माता-पित्याने व पालकाने सहा ते चौदा वर्षा दरम्यानचे आपले अपत्य किंवा पाल्य याला शिक्षणाची संधी देणे.

९) संविधानाच्या कोणत्या भागामध्ये 'अस्पृश्यता' नष्ट करण्याची तरतूद करण्यात आली आहे ?
१) मूलभूत हक्क
२) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे
३) मूलभूत कर्तव्य
४) यापैकी नाही

१०) भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २० नुसार अपराधा बाबतच्या दोषसिद्धी बाबत खालील कोणते संरक्षण दिले आहे ?
अ) अंमलात नसलेल्या कायद्याचा भंग झाल्यामुळे अशा अपराधाबद्दल दोषी ठरविली जाणार नाही.
ब) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा खटला चालविला जाणार नाही.
क) एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा शिक्षा दिली जाणार नाही.
ड) कोणत्याही अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर स्वतःविरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती केली जाऊ शकते.
**पर्यायी उत्तरे** :
१) फक्त अ २) फक्त अ आणि ड ३) फक्त ब आणि क ४) फक्त क

११) संविधानानुसार ........

अ) अटक झालेल्या कोणत्याही व्यक्तीस अशा अटकेपासून चोवीस तासांच्या कालावधीत दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल.

ब) जी व्यक्ती त्यावेळी शत्रूदेशीय असेल किंवा ज्या व्यक्तीला प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद असणाऱ्या कायद्याखाली अटक केली आहे अशा व्यक्तीला वरील तरतूद लागू होणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर
२) फक्त ब बरोबर
३) अ व ब दोन्ही बरोबर
४) अ व ब दोन्ही चुकीचे

१२) सर्वोच्च न्यायालयाने मोफत शिक्षणाचा अधिकार हा कोणत्या अधिकारात समावेश केला आहे ?

१) जगण्याचा अधिकार (Right to Life)
२) शोषणा विरुद्धचा अधिकार (Right against Exploitation)
३) भाषण स्वातंत्र्याचा अधिकार (Right to Freedom of Speech)
४) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार (Cultural and Educational Rights)

१३) खालील कोणता अधिकार मूलभूत अधिकार नाही ?

१) शोषणाविरुद्ध अधिकार
२) सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार
३) घटनात्मक उपाययोजनांचा अधिकार
४) मालमत्तेचा अधिकार

१४) राज्यघटनेनुसार खालीलपैकी कशाचा समावेश 'कायदा' या व्याख्येत होत नाही ?

१) अध्यादेश
२) आदेश
३) रूढी
४) यापैकी नाही

१५) भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदांमध्ये मूलभूत अधिकार हे हमी दिलेले अधिकार आहेत ?

१) अनुच्छेद १५ ते ३६
२) अनुच्छेद १४ ते ३५
३) अनुच्छेद १९ ते ३८
४) अनुच्छेद ३६ ते ५१

## २) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे (कलम ३६ ते ५१)

१) बालकांसाठी सहा वर्ष पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल व शिक्षणाची तरतुदी संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये करण्यात आली आहे ?

१) अनुच्छेद २१ क
२) अनुच्छेद ४५
३) अनुच्छेद २१
४) अनुच्छेद २३

२) भारतीय राज्यघटनेतील खालील कोणते अनुच्छेद हे न्यायपालिकेला कार्यकारी यंत्रणेपासून वेगळे करण्याचे संदर्भात आहे?

१) अनुच्छेद ४८
२) अनुच्छेद ५०
३) अनुच्छेद ५१
४) अनुच्छेद ३९

३) जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| अ) ग्रामपंचायतीचे संघटन | i) अनुच्छेद ४८ |
| ब) सहकारी संस्थांचे प्रवर्तन | ii) अनुच्छेद ४३ ब |
| क) कृषि व पशुसंवर्धन यांची व्यवस्था | iii) अनुच्छेद ४० |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| १) | iii | ii | i |
| २) | i | ii | iii |
| ३) | ii | iii | i |
| ४) | iii | i | ii |

४) खालील विधानापैकी चुकीचे विधान निवडा.
   १) केशवानंद भारती ह्या केस मध्ये २५ व्या घटनादुरुस्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.
   २) अनुच्छेद ४० हे ग्रामपंचायतीचे आयोजन करणे बाबत आहे.
   ३) अनुच्छेद ४४ हे ऐतिहासिक स्वारस्य व राष्ट्रीय महत्त्व असलेल्या सर्व स्मारकांचे संरक्षण करण्याचे संदर्भात आहे.
   ४) अनुच्छेद २९ हे अल्पसंख्यांकांच्या हिताचे संदर्भात आहे.

५) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन देण्याची तरतूद संविधानाच्या कोणत्या भागात आहे ?
   १) मूलभूत हक्क
   २) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे
   ३) मूलभूत कर्तव्य
   ४) यापैकी नाही

६) राज्यघटनेमध्ये, गाई व वासरे आणि इतर दुभती गुरे यांच्या जातीचे वजन करणे आणि त्यांच्या कत्तलीस मनाई करणे या करिता उपाय योजना करील. या तरतुदीचा समावेश कशामध्ये करण्यात आला आहे ?
   १) धार्मिक स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क
   २) सांस्कृतिक व शैक्षणिक मूलभूत हक्क
   ३) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे
   ४) मूलभूत कर्तव्ये

७) संविधानानुसार
   अ) राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे न्यायालयाकरवी अंमलबजावणी योग्य असणार नाही.
   ब) सदर तत्त्वे देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने मूलभूत आहेत आणि कायदे करताना ही तत्त्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य असेल.

   **पर्यायी उत्तरे :**
   १) दोन्ही विधाने बरोबर आहेत
   २) विधान अ बरोबर असून विधान ब चुकीचे आहे
   ३) विधान व बरोबर असून विधान अ चुकीचे आह
   ४) दोन्ही विधाने चुकीचे आहेत

## <u>३) मूलभूत कर्तव्ये (अनुच्छेद – ५१ क )</u>

१) संविधानाचा भाग चार क केव्हापासून लागू झाला आहे ?
   १) दि. ६ जून १९७६
   २) दि. ३ जानेवारी १९७७
   ३) दि. २० जून १९७९
   ४) दि. १० ऑगस्ट १९७५

२) भारतीय राज्यघटनेनुसार खालीलपैकी कोणते मूलभूत कर्तव्य नाही ?
   १) सार्वजनिक निवडणुकीत मतदान करणे
   २) वैज्ञानिक स्वभाव विकसित करणे
   ३) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे
   ४) संविधानाचे पालन करणे आणि त्याच्या आदर्शांचा आदर करणे.

३) खालीलपैकी कशाचा समावेश राज्य धोरणाच्या निदेशाक तत्त्वांमध्ये होत नाही ?
   १) नागरिकांकरिता एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील.
   २) गाई व वासरे आणि इतर दुभती व जुपणीची गुरे यांच्या जातीचे जतन करणे व त्यांच्या कत्तलीस मनाई करणे याकरिता उपाययोजना करील.
   ३) राज्याच्या लोकसेवांमध्ये न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून वेगळी ठेवण्याकरिता राज्य उपाययोजना करील.
   ४) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करण्याचे प्रयत्न करणे.

## महाराष्ट्र नागरी सेवा नियम

## ४) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९

१) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम १९ नुसार 'स्थावर व जंगम मालमत्ता' मध्ये पुढीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश होतो ?
   अ) बँक ठेवीसहित रोख रक्कम
   ब) शेअर्स, ऋणपत्रे
   क) त्याने काढलेली ऋणे आणि इतर दायित्व
   **पर्यायी उत्तरे :**
   १) फक्त अ आणि ब  २) फक्त ब आणि क  ३) फक्त अ आणि क  ४) सर्व पर्याय

२) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम .......... नुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही.
   १) नियम ५(२)  २) नियम ५(४)  ३) नियम ५(१)  ४) नियम ५(३)

३) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ चे तरतुदीनुसार शासकीय कर्मचाऱ्याने कोणता विवाह करताना शासनास तात्काळ कळविले पाहिजे ?
   १) आंतरधर्मीय विवाह  २) आंतरजातीय विवाह
   ३) भारतीय नागरिक नसणाऱ्या व्यक्तीशी विवाह  ४) समलैंगिक विवाह

४) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ नियम २९ मधील परिशिष्ट 'शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेला मान्यता देण्याकरिता शर्ती' मधील 'शासकीय औद्योगिकेतर कर्मचारी' यामध्ये कोणाचा समावेश होईल ?
   अ) मंत्रालयीन कक्ष अधिकारी  ब) तहसीलदार  क) पोलीस सब इन्स्पेक्टर
   **पर्यायी उत्तरे :**
   १) फक्त अ आणि ब  २) फक्त ब आणि क  ३) फक्त अ आणि क  ४) सर्व पर्याय

५) पुढीलपैकी कोणती कृती म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीस अनुसरून नाही ?
   अ) 'ब' हा कर्मचारी मे २०20 ला सेवानिवृत्त झाला. त्याच्या निरोप समारंभात 'क' या कर्मचाऱ्याने शासनाच्या सेवेतील त्याच्या उपलब्धीबाबत शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय भाषण केले.
   ब) सदर निरोप समारंभासाठी गट 'क' व गट 'ड' च्या कर्मचाऱ्यांकडून वर्गणी वसूल करण्यात आली.
   **पर्यायी उत्तरे :**
   १) फक्त अ  २) फक्त ब  ३) अ आणि ब  ४) कोणतीही नाही

६) खालील कोणते विधान चुकीचे आहे ?

अ) शासकीय कर्मचाऱ्याला स्वतःचे नाव शाळा किंवा कोणत्याही सार्वजनिक संस्थेशी जोडण्यास अनुमती देता येईल.

ब) शासनाच्या पूर्वमान्यतेने एखाद्या पदक किंवा चषकास स्वतःचे नाव जोडण्यास शासकीय कर्मचाऱ्याला अनुमती देता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ २) फक्त ब ३) अ आणि ब दोन्हीही ४) यापैकी एकही नाही

७) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये 'शासकीय कर्मचारी' या व्याख्येत कोणाचा समावेश होतो ?

अ) महाराष्ट्र राज्याच्या कामकाजासंबंधातील कोणत्याही नागरी किंवा सेवेत किंवा पदावर नियुक्त केलेली व्यक्ती.

ब) अशी व्यक्ती जिची सेवा कंपनीकडे, महामंडळाकडे, संघटनेच्या स्थानिक प्राधिकरणाकडे सोपविलेली असेल व तिचे वेतन राज्याच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असेल.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त अ आणि ब ४) कोणतीही नाही

८) पुढीलपैकी कोणती कृती ही म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीस अनुसरून नाही ?

१) शासकीय कर्मचारी सार्वजनिक मंडळाने आयोजित केलेल्या कमी खर्चाच्या साध्या अशा मनोरंजनपर कार्यक्रमाला उपस्थित होता.

२) शासकीय कर्मचारी शासनाच्या मान्यतेने धर्मदाय स्वरूपाचे मानसेवी काम हाती घेऊ शकेल.

३) शासकीय कर्मचारी सट्टेबाजीच्या उद्देशाने शेअर्स, कर्जरोखे यांची वारंवार खरेदी विक्री करू शकतो.

४) शासकीय कर्मचाऱ्याला विहित प्राधिकरणाच्या मंजुरीने सार्वजनिक संस्थेकरिता किंवा खाजगी व्यक्तीकरिता फी स्वीकारता येईल.

९) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये १४ वर्षाखालील मुलांना नोकरीस ठेवण्यास प्रतिबंध करणारी तरतूद खालील कोणत्या शासन अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आली आहे ?

१) २३ ऑक्टोबर, २०१५ २) १ डिसेंबर, १९९७ ३) २४ फेब्रुवारी, २०१४ ४) १८ जुलै, २००८

१०) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम १९ नुसार गट ब चे पद धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत विहित प्राधिकरण याचा अर्थ ............... आहे.

१) शासन २) विभाग प्रमुख ३) कार्यालय प्रमुख ४) वरीलपैकी एकही नाही

११) भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाच्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून 'महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९' तयार करण्यात आले आहेत ?

१) अनुच्छेद ३१२ A २) अनुच्छेद ३०९ ३) अनुच्छेद २७५ ४) अनुच्छेद ३२८

१२) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील २२ अ नुसार कोणती परिस्थिती ही लैंगिक छळवादाच्या कृती किंवा वर्तणुकीशी संबंधित असेल तर ती लैंगिक छळवाद मानली जाईल.

अ) तिच्या कामामध्ये विशेष वागणूक देण्याचे आश्वासन देणे.

ब) तिच्या कामामध्ये हानिकारक वागणूक देण्याची धमकी देणे.

क) तिच्या स्वास्थ्यावर किंवा सुरक्षिततेवर परिणाम करणारी अपमानास्पद वागणूक देणे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ आणि ब २) फक्त ब आणि क ३) फक्त अ आणि क ४) अ, ब आणि क

१३) शासकीय कर्मचारी बाबत खालील कोणते विधान बरोबर आहे ?

अ) महाराष्ट्र राज्याच्या कामकाजा संबंधातील कोणत्याही सेवेत किंवा पदावरील व्यक्ती.

ब) ज्याची सेवा कंपनीकडे, महामंडळाकडे, संघटनेच्या स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा अन्य कोणत्याही शासनाकडे सोपविलेली असेल, मग त्याचे वेतन राज्याच्या एकत्रित निधीव्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असेल.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) अ आणि ब दोन्हीही   ४) यापैकी एकही नाही

१४) विधाने लक्षात घ्या :

अ) कोणताही शासकीय कर्मचारी शासनाच्या संमतीने साक्ष देत असताना शासनाच्या धोरणावर किंवा कृतीवर टीका करू शकणार नाही.

ब) लोकलेखा समितीसमोर किंवा न्यायिक चौकशीच्या वेळी दिलेल्या साक्षीला वरील नियम लागू होणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ बरोबर, ब चुकीचे   २) अ चुकीचे, ब बरोबर

३) दोन्ही विधाने बरोबर आहेत   ४) दोन्ही विधाने चुकीचे आहेत.

१५) शासकीय कर्मचाऱ्याने कोणत्या मालमत्तेचे विवरण सादर करणे आवश्यक आहे ?

१) स्थावर मालमत्तेचे   २) मौल्यवान मालमत्तेचे

३) जंगम मालमत्तेचे   ४) स्थावर, जंगम व मौल्यवान मालमत्तेचे

१६) शासकीय कर्मचाऱ्यांच्या सन्मानार्थ सार्वजनिक समारंभामध्ये, समारंभ ......... किंवा ............. स्वरूपाचा असला तरीही सक्तीने वर्गणी वसूल करण्यास मनाई आहे.

१) खाजगी, वैयक्तिक   २) वैयक्तिक, मनोरंजन

३) पूर्णपणे खाजगी, अनौपचारिक   ४) मनोरंजनाचा, खाजगी

१७) महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता देण्याचे दृष्टीने म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये नियम २२–अ हे खालील कोणत्या शासन अधिसूचनेद्वारे दाखल करण्यात आले ?

१) १८ जुलै, २००८   २) ८ फेब्रुवारी, २००७   ३) २३ ऑक्टोबर, २०१५   ४) ७ मे, २०१३

१८) पुढीलपैकी कोणती कृती म.ना.से. (वर्तणूक) नियमातील तरतुदीस अनुसरून नाही ?

१) 'क्ष' या कर्मचाऱ्याने वृत्तपत्रासाठी राजकीय स्वरूपाचे लेख पाठविले.

२) शासकीय कर्मचाऱ्याने शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय स्वतःचा काव्यसंग्रह प्रकाशित केला.

३) शासकीय कर्मचारी शासनाच्या मंजुरीने अराजकीय स्वरूपाच्या नियतकालिक प्रकाशनाच्या व्यवस्थापनात सहभागी झाला.

४) शासकीय कर्मचाऱ्याने ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर माहितीपर भाषण दिले.

१९) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम १० मध्ये शासकीय कर्मचाऱ्याने समिती किंवा प्राधिकरणापुढे साक्ष देणेबाबतची तरतूद खालीलपैकी कोणत्या साक्षी करिता लागू नाही ?

१) शासनाने किंवा संसदेने किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाने नियुक्त केलेल्या प्राधिकरणासमोर होणाऱ्या कोणत्याही चौकशीच्या वेळी दिलेली साक्ष.

२) न्यायिक चौकशीच्या वेळी दिलेली साक्ष.

३) शासनाने किंवा शासनाला दुय्यम असणाऱ्या कोणत्याही प्राधिकरणाने आदेश दिलेल्या विभागीय चौकशीच्या वेळी दिलेली साक्ष.

४) पर्याय (१), (२) आणि (३)

२०) म.ना.से. (वर्तणूक) नियम २२ अ नुसार 'कामाचे ठिकाण' यामध्ये खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही ?

अ) शासनाच्या नियंत्रणाखाली असलेला विभाग    ब) रुग्णालये

क) क्रीडासंस्था    ड) घर

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ    २) फक्त ब    ३) फक्त ड    ४) कोणताही नाही

२१) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ चे तरतुदीनुसार गट अ चे कोणतेही पद धारण करणारा शासकीय कर्मचारी विवाह, वर्षदिन, अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभाचेवेळी किती देणगी स्वीकारू शकतो ?

१) रु.५०,०००    २) रु.२५,०००    ३) रु.१०,०००    ४) रु.५,०००

२२) म.ना.से. (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार खालीलपैकी कोणत्या कृतीसाठी शासनाची पूर्वमंजुरी आवश्यक आहे ?

१) शासकीय कर्मचाऱ्याच्या पतीने किंवा पत्नीने वारसाहक्काने मिळालेल्या उत्पन्नातून केलेला व्यवहार

२) शासकीय कर्मचाऱ्याच्या पत्नीने स्त्रीधनातून केलेला व्यवहार

३) शासकीय कर्मचाऱ्याच्या पत्नीने किंवा पतीने विवाहनिमित्त मिळालेल्या देणगीतून केलेला व्यवहार.

४) शासकीय कर्मचाऱ्याने नेहमीच्या किंवा प्रसिद्ध व्यापाऱ्यामार्फत केला नसेल असा व्यवहार

२३) ''शासकीय औद्योगिकेतर कर्मचारी'' यामध्ये कोणत्या कर्मचाऱ्यांचा समावेश होतो ?

१) केवळ प्रशासनिक काम पार पाडण्यासाठी नियुक्त केलेले कर्मचारी

२) ज्यांना कारखाना अधिनियम लागू होतो असे शासकीय कारखान्यातील शासकीय उपक्रमातील कामगार

३) पोलीस

४) तुरुंग विभागात काम करणारे व्यक्ती

२४) शासकीय कर्मचारी संदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

१) शासकीय कर्मचारी शासनाची पूर्वमंजुरी मिळाल्याखेरीज प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यापारात किंवा धंद्यात गुंतवणार नाही.

२) शासकीय कर्मचारी शासनाची पूर्वमंजुरी मिळाल्याखेरीज कोणताही व्यापार करू शकतो.

३) शासनाची पूर्वमंजुरी शिवाय दुसरी कोणतीही नोकरी स्वीकारू शकतो.

४) कुटुंबातील व्यक्तीच्या विमा एजन्सीचा प्रचार करू शकतो.

## ५) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१

१) धारणाधिकार :

अ) कोणत्याही स्थायी पदावर कायम नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचारी त्या पदाचा धारणाधिकार संपादित करतो.

ब) अन्य कोणत्याही पदावर त्याने पूर्वी संपादित केलेला कोणताही धारणाधिकार समाप्त होतो.

**पर्यायी उत्तरे :**

१) दोन्ही विधाने बरोबर आहेत    २) दोन्ही विधाने चुकीची आहेत

३) विधान अ बरोबर असून विधान ब चुकीचे आहे    ४) विधान ब बरोबर असून विधान अ चुकीचे आहे

२) खालीलपैकी कोणत्या प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात केली जात नाही ?
१) वैद्यकीय प्रमाणपत्र
२) जन्मतारीख नोंद
३) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्र
४) जात प्रमाणपत्र

३) 'लेखापरीक्षा अधिकारी' संदर्भात खालील कोणते विधान बरोबर आहे ?
अ) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नियुक्त केलेला.
ब) लेखापरीक्षा मंडळामध्ये सेवा करीत असलेला शासकीय कर्मचारी.
**पर्यायी उत्तरे** :
१) फक्त अ
२) फक्त ब
३) अ आणि ब दोन्हीही
४) यापैकी एकही नाही

४) नियतकालिक वेतनवाढीमुळे जे किमान वेतनापासून कमाल वेतनापर्यंत वाढत जाते अशा वेतनाला काय म्हणतात?
१) समयश्रेणी वेतन
२) विशेष वेतन
३) वैयक्तिक वेतन
४) संभाव्य वेतन

५) सेवा पुस्तकाच्या वार्षिक पडताळणी बाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
१) प्रत्येक वर्षी 'मे' महिन्यात पडताळणी करावी.
२) वेतनदेयके, वेतनपट ग्राह्य धरण्यात येऊ नये.
३) सेवा पुस्तकातील नोंदीची इतर अभिलेखावरून पडताळणी करावी.
४) सेवापुस्तकात पडताळणी केल्याची नोंद कार्यालय प्रमुखाने घ्यावी.

६) शासकीय सेवेकरिता पात्रता विषयक वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये खालील कोणत्या बाबींचा समावेश असतो ?
अ) ओळख चिन्ह
ब) देवी काढल्या आहेत किंवा नाहीत
क) उमेदवाराच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा.
**पर्यायी उत्तरे** :
१) फक्त अ
२) फक्त क
३) फक्त अ आणि क
४) वरीलपैकी सर्व

७) राज्याच्या एकत्रित निधीत खालीलपैकी कशाचा समावेश होत नाही ?
१) भारत सरकारकडून प्राप्त सर्व महसुली रकमा
२) राजकोष पत्राच्या विक्रीद्वारे उभारलेली कर्जे
३) अर्थोपाय आगाऊ रकमा
४) भविष्य निर्वाह निधीच्या रकमा

८) पुढीलपैकी कोणत्या प्रकरणी शासकीय कर्मचाऱ्याची कमी वेतन असणाऱ्या पदावर बदली करता येते ?
अ) कर्मचाऱ्याने लेखी विनंती केल्यास
ब) वैद्यकीय कारणास्तव
क) कर्मचाऱ्याची अकार्यक्षमता
ड) कर्मचाऱ्याची गैरवर्तणूक
**पर्यायी उत्तरे** :
१) फक्त अ आणि ब
२) फक्त क आणि ड
३) यापैकी कोणतेही नाही
४) अ, ब, क आणि ड सर्व प्रकरणी

९) ज्या शासकीय कर्मचाऱ्यास जन्माचे वर्ष व महिना माहीत आहे, पण नेमकी तारीख माहीत नाही त्यावेळी कोणती तारीख जन्मतारीख म्हणून मानण्यात यावी ?
१) १ तारीख
२) १५ तारीख
३) १८ तारीख
४) १६ तारीख

१०) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या नियम ३४ नुसार शासकीय कर्मचाऱ्याचा ............ शासनाच्या सेवेसाठी असतो.

१) केवळ कार्यालयीन मर्यादेचा वेळ
२) केवळ ८ तासाचा वेळ
३) संपूर्ण वेळ
४) कार्यालय प्रमुखाने दिलेल्या आदेशानुसारचा वेळ

११) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राच्या सेवापुस्तकातील नोंदीबाबत खालील योग्य पर्याय निवडा.

अ) वैद्यकीय चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात करू नये.

ब) विभाग प्रमुखाच्या आदेशाशिवाय वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात करू नये.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ बरोबर
२) फक्त ब बरोबर
३) अ आणि ब दोन्हीही बरोबर
४) यापैकी एकही नाही

१२) प्रवास भत्त्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याच्या वाहनांच्या देखभालीसाठी दिलेल्या भत्त्यांचा, तसेच वाहक इत्यादींना बक्षिसी देण्याचा खर्च यांचा समावेश होतो. हे विधान .........

१) चूक आहे
२) बरोबर आहे
३) अंशतः चूक आहे
४) अंशतः बरोबर आहे

१३) सर्वसाधारणपणे पुढीलपैकी कोणत्या बाबींची नोंद सेवापुस्तकात घेण्यात येते ?

अ) जन्मतारीख
ब) राहण्याचे ठिकाण
क) वैयक्तिक ओळख चिन्हे
ड) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त अ
२) फक्त अ आणि ब
३) फक्त अ, ब आणि क
४) अ, ब, क आणि ड सर्व

१४) खालील विधान वाचा व उत्तर द्या.

शासकीय कर्मचाऱ्याला जेव्हा वाढीव जबाबदाऱ्यासहीत बढतीचे नवीन पद ग्रहण करावयाचे असेल तेव्हा, नवीन पदाची कर्तव्ये स्वीकारली असतील त्या तारखेपासूनच उच्चतर वेतन अनुज्ञेय होईल.

१) वरील विधान पूर्णतः चूक आहे
२) वरील विधान अंशतः चूक आहे
३) वरील विधान बरोबर आहे
४) यापैकी एकही नाही

१५) पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

अ) अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यावर विहित नमुन्यातील त्याचे सेवापुस्तक विनामूल्य दोन प्रतीत ठेवले पाहिजे.

ब) सेवापुस्तकाची एक प्रत कार्यालय प्रमुखाच्या अभिरक्षेत ठेवावी, तर दुसरी प्रत संबंधित शासकीय कर्मचाऱ्याला देण्यात यावी.

**पर्यायी उत्तरे :**

१) अ बरोबर, ब चूक
२) अ चूक, ब बरोबर
३) अ आणि ब दोन्ही बरोबर
४) अ आणि ब दोन्ही चूक

१६) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ चे नियम ३१ मधील तरतुदीच्या अपवादातील दीर्घ सुट्टी व संज्ञेमध्ये ................ समावेश होतो.

१) राष्ट्रीय सुट्यांचा
२) सार्वजनिक सुट्यांचा
३) अनौपचारिक सुट्यांचा
४) पर्यायी सुट्यांचा

१७) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ चे नियम १९ नुसार शासन सेवेकरिता आलेल्या उमेदवाराची नेत्रदोषा व्यतिरिक्त कोणतीही विकलांगता कोण माफ करू शकते ?

१) वैद्यकीय अधिकारी २) वैद्यकीय मंडळ ३) संचालक आरोग्य सेवा ४) कार्यालय प्रमुख

१८) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ चे नियम १८ नुसार कोणत्या कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यापासून सूट दिली आहे ?

१) तात्पुरत्या सेवेतील कर्मचाऱ्यांना
२) व्यंग असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना
३) सेवानिवृत्तीनंतर सहा महिन्याचे आत पुनर्नियुक्ती केलेल्या सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना
४) रुग्णता निवृत्ती धारकास पुनर्नियुक्त करण्यापूर्वी

१९) शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तकाचा विहित नमुना म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील कोणत्या परिशिष्टात देण्यात आला आहे ?

१) परिशिष्ट तीन २) परिशिष्ट चार ३) परिशिष्ट पाच ४) परिशिष्ट सहा

२०) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ९(१४) नुसार कर्तव्यामध्ये खालील कोणत्या बाबींचा समावेश होतो ?

अ) परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा
ब) शासनाच्या आदेशाद्वारे किंवा त्यान्वये प्राधिकृत केलेला निदेशन पाठ्यक्रम अथवा प्रशिक्षण पाठ्यक्रम
ड) पदग्रहण अवधी

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त अ २) फक्त अ आणि क ३) वरील सर्व ४) फक्त क

२१) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ हे महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आले आहेत ?

१) सामान्य प्रशासन विभाग २) वित्त विभाग
३) संसदीय कार्य विभाग ४) विधी व न्याय विभाग

२२) म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील तरतुदींनुसार 'शासन' म्हणजे

१) महाराष्ट्राचे राज्यपाल २) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री
३) विभागाचे मंत्री ४) विभाग प्रमुख

२३) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ हे नियम कधीपासून अंमलात आले.

१) १ जून १९८१ २) १५ ऑगस्ट १९८१
३) १ ऑगस्ट १९८१ ४) १५ जून १९८१

२४) पुढीलपैकी योग्य विधाने ओळखा :

अ) दोन किंवा त्याहून अधिक शासकीय कर्मचाऱ्यांची एकाच स्थायी पदावर एकाच वेळी कायम नियुक्ती करता येत नाही.
ब) शासकीय कर्मचाऱ्याची एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक स्वतंत्र व स्थायी पदांवर नियुक्ती करता येत नाही

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त अ योग्य २) फक्त ब योग्य
३) अ आणि ब दोन्ही योग्य ४) अ आणि ब दोन्ही अयोग्य

२५) दुय्यम कार्यालयात ठेवलेल्या सेवा पुस्तकांची तपासणी करणे, हे कार्यालयाच्या कोणत्या अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे ?
१) कार्यालय प्रमुख
२) सक्षम अधिकारी
३) तपासणी करणारा अधिकारी
४) लेखा परीक्षा अधिकारी

## मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक

## ६) संविधान भाग ६ – प्रकरण १ ते ४ (कलम १५२ ते २१३)

१) सांविधिक नियम व आदेश काढताना विभागाशी विचारविनिमय करणे आवश्यक आहे ?
१) सामान्य प्रशासन विभाग
२) विधी व न्याय विभाग
३) वित्त व नियोजन विभाग
४) महसूल व वन विभाग

२) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम ............ हा केंद्रीय कायदा आहे.
१) १९७०
२) १९७२
३) १९६४
४) १९६९

३) राज्य विधानमंडळामध्ये मांडलेल्या प्रत्येक विधेयकाची प्रत माहितीसाठी कोणाकडे सादर करावी लागते ?
१) राष्ट्रपती
२) राज्यपाल
३) केंद्र सरकार
४) राज्यपाल व केंद्र सरकार

४) मराठी भाषेचा सर्वांगीण विकास, भाषा आणि साहित्य संस्कृतीची जोपासना/संवर्धन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० मध्ये अंतर्भूत केलेला कोणता उपक्रम दरवर्षी मुंबई व मुंबई उपनगर वगळून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केला जातो ?
१) मराठी भाषा दिवस
२) मराठी भाषा पंधरवडा
३) पुस्तकांचे गांव
४) ग्रंथोत्सव

५) महाराष्ट्रात सेवा हक्क अधिनियम कधी लागू करण्यात आला ?
१) २०१२
२) २००५
३) २०१५
४) २०१६

६) महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्र. ८८ अन्वये कोणत्याही सदस्यास ज्या बाबीसाठी उत्तर देण्यात आले असेल अशी कोणतीही बाब अधिक स्पष्ट करण्याच्या कारणास्तव ................ प्रश्न विचारता येईल.
१) तारांकित
२) अतारांकित
३) पुरवणी
४) पूरक

७) विधिमंडळात ज्या प्रश्नाचे उत्तर केवळ लेखी दिले जाते त्याला काय म्हणतात ?
१) तारांकित
२) अल्पसूचना प्रश्न
३) पुरवणी प्रश्न
४) अतारांकित प्रश्न

८) अल्पवेळ चर्चा उपस्थित करण्यासंबंधीच्या सूचनेच्या पृष्ट्यर्थ किमान इतर ............ सदस्यांनी त्यावर सही केलेली असेल.
१) १
२) २
३) ३
४) ४

९) खालीलपैकी कोणते अंदाज समितीचे कर्तव्य नाही ?
१) खर्चाच्या अंदाजाची तपशीलवार छाननी करणे
२) पूरक अनुदानासाठीच्या मागण्यांची छाननी करणे.
३) राज्य शासनाच्या वित्तीय लेखांचे परिनिरीक्षण करणे
४) वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे

१०) राज्य शासनाच्या वित्तीय लेखांचे व त्यावरील लेखापरीक्षण अहवालाचे परिनिरीक्षण .............. समितीमार्फत करण्यात येते.

१) अंदाज समिती
२) लोकलेखा समिती
३) सार्वजनिक उपक्रम समिती
४) उपविधान समिती

११) एखाद्या राज्यातील विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या किमान किती असते ?

१) साठ
२) चाळीस
३) पन्नास
४) सत्तर

१२) खालीलपैकी कोणत्या राज्यात विधानमंडळाची दोन सभागृहे नाहीत ?

१) महाराष्ट्र
२) कर्नाटक
३) आंध्रप्रदेश
४) मध्यप्रदेश

१३) राज्य विधानमंडळाच्या सभागृहाची गणपूर्ती किती आहे ?

१) दहा सदस्य किंवा त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश यापैकी कमी असेल ती
२) दहा सदस्य
३) सभागृहातील एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश
४) दहा सदस्य किंवा त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश यापैकी जी अधिक असेल ती

१४) विधानमंडळाच्या विरामकालात अध्यादेश प्रस्थापित करण्याचा राज्यपालांचा अधिकार संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार आहे ?

१) अनुच्छेद २१०
२) अनुच्छेद २११
३) अनुच्छेद २१२
४) अनुच्छेद २१३

१५) देशातील एकूण किती राज्यामध्ये विधानपरिषद अस्तित्वात आहे ?

१) ५
२) ६
३) १०
४) १२

## ७) विधीमंडळ कामकाज

## ८) प्रशासकीय सुधारणा वा कल्याणकारी धोरणे/निर्णय

## ९) मंत्रालयातील कामकाजविषयक नियम व सूचना

१) 'ब' वर्ग दप्तरी दाखल कागदपत्रे किती काळ जतन करून ठेवणे आवश्यक आहे ?

१) पाच वर्षे
२) एक वर्षे
३) तीस वर्षे
४) कायमस्वरूपी

२) सर्वसाधारण प्रकरणे किती दिवसात निकालात काढण्यात यावीत ?

१) चार दिवसाच्या आठ
२) एक आठवड्याच्या आत
३) पंधरा दिवसाच्या आत
४) ३० दिवसाच्या आत

३) तातडीचे प्राथम्यक्रम असणाऱ्या नस्तीवर किती दिवसांत कार्यवाही अपेक्षित आहे ?

१) एक दिवस
२) दोन दिवस
३) सात दिवस
४) चार दिवस

४) ‘अ’ व ‘ब’ वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या नस्तींचे किती वर्षांनी पुनर्विलोकन करण्यात येते ?
१) दर तीन वर्षांनी २) दर दहा वर्षांनी ३) दर पाच वर्षांनी ४) दर सात वर्षांनी

५) अधिकाऱ्याने चर्चेसाठी कार्यालयाकडे पाठवलेली प्रकरणे किती कालावधीत चर्चेसाठी घेण्यात यावीत ?
१) २४ तासांच्या आत २) चार दिवसाच्या आत ३) एका आठवड्याच्या आत ४) वरीलपैकी एकही नाही

६) फाइल केलेल्या प्रकरणांची सूची नि स्थलांतर नोंदपत्रे वेगळी ठेवून ती ‘ड’ वर्गाचा अभिलेख म्हणून किती कालावधीकरिता जतन करावीत ?
१) एक वर्ष २) पाच वर्ष ३) वीस वर्ष ४) तीस वर्ष

७) नवीन प्रकरण चालू करताना कोणत्या पत्राचा वापर करावा ?
१) निर्देश पत्र २) पृथक पत्र ३) साधे पत्र ४) आवक पत्र

८) ज्या कागदपत्राबाबतचा विचारविनिमय, हा त्या फायलीचा विषय आहे अशा कागदपत्रावर ............... अशी चिठ्ठी लावण्यात यावी.
१) मान्यतेसाठी मसुदा २) विचाराधीन कागदपत्रे ३) निकडीचे ४) वरीलपैकी नाही

## १०) मंत्रालयातील कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका

१) वित्त विभागाकडे ३ आठवड्याहून अधिक काळ प्रलंबित असणाऱ्या संदर्भाची सूची वित्त विभागाकडे किती दिवसांनी पाठविण्यात यावी ?
१) ७ दिवस २) १० दिवस ३) १५ दिवस ४) ३० दिवस

२) मंत्रालयीन विभाग मध्ये खालीलपैकी कोणती प्राथम्यक्रमाची चिन्हे वापरण्यात येत नाही ?
१) टंचाई प्राथम्य २) विधानसभा/विधानपरिषद प्रश्न
३) निकडीचे ४) सर्वसाधारण

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक

## ११) संविधानातील लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद ३१५ ते ३२३

१) राज्य विधानमंडळाने केलेल्या अधिनियमाद्वारे राज्य लोकसेवा आयोगाकडून राज्याच्या सेवाबाबतची अतिरिक्त कार्ये पार पाडण्याची तरतुदी भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदांमध्ये आहे ?
१) अनुच्छेद ३२० २) अनुच्छेद ३२१ ३) अनुच्छेद ३२२ ४) अनुच्छेद ३२३

२) खालीलपैकी अचूक पर्याय निवडा :
**विधान (अ) –** राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य मुख्यमंत्र्यास संबोधून आपल्या सहीनिशी आपल्या पदाचा लेखी राजीनामा देऊ शकेल.
**विधान (ब) –** लोकसेवा आयोगाचा सदस्य म्हणून पद धारण करीत असेल ती व्यक्ती, तिचा पदावधी समाप्त झाल्यावर, त्या पदावर पुनर्नियुक्ती होण्यास पात्र नसेल.
**पर्यायी उत्तरे :**
१) फक्त विधान (अ) बरोबर २) फक्त विधान (ब) बरोबर
३) दोन्ही विधाने बरोबर आहेत ४) दोन्ही विधाने चूक आहेत

३) पर्याय निवडा :

**विधान (अ) –** राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष फक्त संघ लोकसेवा आयोगाचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यास पात्र असेल.

**विधान (ब) –** राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य भारत सरकारच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही नोकरीस पात्र असेल.

**पर्यायी उत्तरे :**

१) विधान (अ) बरोबर, (ब) चूक आहे.
२) विधान (अ) चूक, (ब) बरोबर आहे
३) दोन्ही विधाने चूक आहेत
४) दोन्ही विधाने बरोबर आहेत

४) खालीलपैकी अचूक पर्याय निवडा :

**विधान (अ) –** संघ किंवा राज्य लोकसेवा आयोगाचा खर्च भारताच्या किंवा राज्यांच्या एकत्रित निधीतून भागविण्याची तरतूद भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२२ मध्ये आहे.

**विधान (ब) –** आयोगाचा सदस्य आणि कर्मचारी वर्ग यांच्या सेवाशर्तीबाबत विनियम करण्याच्या अधिकाराची तरतूद संविधानाच्या अनुच्छेद ३१७ मध्ये आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त विधान (अ) बरोबर
२) फक्त विधान (ब) बरोबर
३) दोन्ही विधाने बरोबर आहेत
४) दोन्ही विधाने चूक आहेत

५) राज्य लोकसेवा आयोगाचा सदस्य नादार असल्याचे न्यायनिर्णित झाल्यास त्याला त्याच्या पदावरून दूर करण्याचे अधिकार खालीलपैकी कोणास आहेत ?

१) सर्वोच्च न्यायालय
२) राज्याचे महाधिवक्ता
३) राष्ट्रपती
४) राज्यपाल

## १२) एमपीएससी (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती विनियम), १९७१

१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम १९७१ हे विनियम भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून तयार करण्यात आले आहेत ?

१) अनुच्छेद ३१८
२) अनुच्छेद ३२०
३) अनुच्छेद ३२१
४) अनुच्छेद ३२३

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) १९७१ मधील तरतुदींसंदर्भात खालील जोड्या जुळवा :

| ***भाग*** | ***तरतुदी*** |
|---|---|
| अ) भाग–३ | i) प्रवासभत्ता |
| ब) भाग–४ | ii) (आयोगाच्या कार्यालयाची) रचना |
| क) भाग–५ | iii) रजा |
| ड) भाग–६ | iii) निवृत्तिवेतन आणि भविष्यनिर्वाह निधी |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| १) | iv | iii | ii | i |
| २) | iii | iv | i | ii |
| ३ ) | iii | ii | i | iv |
| ४) | ii | i | iv | iii |

३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम १९७१ नुसार ''नियुक्ती वेतनार्ह सेवा'' यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे :

**विधान (अ) –** सदस्याने सदस्य या नात्याने कर्तव्यार्थ व्यतीत केलेला काळ.

**विधान (ब) –** पूर्ण वेतनाएवढ्या रजावेतनी रजेवर असताना अनुपस्थितीचा कोणताही कालावधी.

**पर्यायी उत्तरे** :

१) फक्त विधान (अ) बरोबर आहे
२) फक्त विधान (ब) बरोबर आहे
३) विधाने (अ) आणि व दोन्ही बरोबर आहेत
४) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही चूक आहेत

४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील वर्ग–चार (गट–ड) मधील कर्मचाऱ्यांची नेमणूक खालीलपैकी कोणाकडून करण्यात येते?

१) अध्यक्ष
२) अवरसचिव – आस्थापना
३) उपसचिव–आस्थापना
४) सचिव

## १३) एमपीएससीतील कार्यालयीन कार्यपद्धती

१) आयोगाच्या सरळसेवा विभागामार्फत दोन पदांसाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीस अनुसरून मुलाखतीसाठी किती उमेदवार बोलाविणे अनिवार्य आहे ?

१) दहा
२) आठ
३) सहा
४) पाच

२) सरळसेवा भरतीकरिता मुलाखतीमधून शिफारसींसाठी विचारक्षेत्रात येण्यासाठी मागासवर्गीय उमेदवारांना मुलाखतीमध्ये किमान किती टक्के गुण प्राप्त होणे आवश्यक आहे ?

१) ३५%
२) ४०%
३) ४१%
४) ४५%

३) उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरिता नॉन क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा सध्या किती व कोणत्या शासन निर्णयानुसार आहे?

१) सहा लाख, १३ सप्टेंबर, २०१६
२) दहा लाख, ०५ मे, २०१८
३) आठ लाख, १६ डिसेंबर, २०१७
४) सात लाख, २० नोव्हेंबर, २०१७

४) आयोगाने प्रसिद्ध केलेल्या एका स्पर्धा परीक्षेच्या जाहिरातीत पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखत असे टप्पे आहेत, तर उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता कोणत्या दिनांकापर्यंत धारण करणे आवश्यक आहे ?

१) जाहिरात प्रसिद्ध झाली त्या दिनांकापर्यंत
२) जाहिरातीनुसार पूर्व परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत
३) मुख्य परीक्षेच्या दिनांकापर्यंत
४) मुख्य परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत

५) आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिवांची नियुक्ती तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल, तर कोणाची मान्यता आवश्यक आहे ?

१) आयोगाचे अध्यक्ष
२) संपूर्ण आयोगाची
३) सामान्य प्रशासन विभाग
४) राज्यपाल

६) अचूक पर्याय निवडा :

**विधान (अ) –** महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यालयाचे अधिकृत ट्विटर हॅण्डल ऑगस्ट, २०२१ पासून सुरू करण्यात आले आहे.

**विधान (ब) –** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात येणारी प्रसिद्धिपत्रक, जाहिराती, निकाल इत्यादी संदर्भात अद्यावत माहिती उमेदवारांपर्यंत वेळेत पोहचावी या हेतूने आयोगाकडून टेलिग्राम चॅनल (t.me/official_mpsc) सुरू करण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

१) फक्त विधान (अ) बरोबर आहे
२) फक्त विधान (ब) बरोबर आहे
३) दोन्ही विधाने बरोबर आहेत
४) दोन्ही विधाने चूक आहेत

## १४) एमपीएससी व शासन दरम्यानच्या पत्रव्यवहार /कार्यनियमावली

१) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक या पदांच्या प्रतीक्षा यादीचा कालावधी २ वर्षाकरिता वाढविण्याबाबतची सुधारणा आयोगाच्या कार्यनियमावलीमध्ये कोणत्या दिनांकास करण्यात आली ?

१) २८ डिसेंबर, २०१६
२) २५ डिसेंबर, २०१६
३) २० डिसेंबर, २०१६
४) १५ डिसेंबर, २०१६

२) विद्यमान परीक्षा योजनेनुसार राज्य सेवा परीक्षेतून शासनाच्या विविध मंत्रालयीन विभागाच्या आधिपत्याखालील एकूण किती संवर्गांची पदे भरण्यात येतात ?

१) २८ संवर्ग
२) २५ संवर्ग
३) १९ संवर्ग
४) ३० संवर्ग

३) आयोगाच्या कार्यनियमावलीत तरतुदींसंदर्भात खालील जोड्या जुळवा :

| **नियम** | **तरतुदी** |
|---|---|
| अ) नियम क्र. ८ | i) सरळसेवा निवडप्रक्रिया भरती |
| ब) नियम क्र. ९ | ii) स्पर्धा परीक्षा निवडप्रक्रिया तपशील |
| क) नियम क्र. १० | iii) नियमन पद्धत |
| ड) नियम क्र. १२ | iii) मुलाखत समितीची नियुक्ती व निकालाची घोषणा |

**पर्यायी उत्तरे :**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| १) | i | ii | iv | iii |
| २) | ii | i | iv | iii |
| ३) | ii | iii | i | iv |
| ४) | iv | iii | ii | i |

४) आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार आयोगाची बैठक कधी आयोजित करणे अपेक्षित आहे ?

१) प्रत्येक महिन्यात एकदा
२) दोन महिन्यात एकदा
३) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात
४) तीन महिन्यात एकदा

५) आयोगाने प्रसिद्ध केलेल्या पदाच्या मुलाखतीच्या तारखा ठरविणे आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार खालीलपैकी कोणाच्या अखत्यारीत येते ?

१) सचिव २) मुलाखत समिती ३) अध्यक्ष ४) आयोग

६) महाराष्ट्र वन सेवा परीक्षेमध्ये सहायक वन संरक्षक गट–अ, वन क्षेत्रपाल गट–ब अशी पदे आहेत. सदर परीक्षेतील काही उमेदवार रुजू झाले नाहीत. त्या बदली शासनाने पर्यायी उमेदवारांची मागणी केली आहे. तर खालील कार्यवाही करण्यात येईल.

१) आयोग स्तरावर निर्णय घेऊन प्रतीक्षा यादीतून उमेदवार उपलब्ध करून देतील.
२) मंत्रिमंडळाने ठराव केला असल्यामुळे प्रतीक्षा यादीतून उमेदवार उपलब्ध करून देण्यात येतील.
३) शासनास निकड असली तरी बहुसंवर्ग पदांच्या प्रतीक्षायादी संदर्भातील तरतुदीनुसार उमेदवार उपलब्ध करून देता येणार नाहीत.
४) शासनाची निकड विचारात घेऊन प्रतीक्षा यादीतील उमेदवार उपलब्ध करून देण्यात येतील.

## १५) एमपीएससीद्वारे प्रसिद्ध अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल

१) उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरिता नॉन क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा सध्या दि. ............ च्या शासननिर्णयानुसार ............ निश्चित करण्यात आली आहे.

१) १३ सप्टेंबर, २०१६, सहा लक्ष २) २० नोव्हेंबर, २०१७, सात लक्ष
३) १६ डिसेंबर, २०१७, आठ लक्ष ४) ०५ मे, २०१८ दहा लक्ष

२) राज्य सेवा परीक्षान्वये शासन सेवेतील प्रवेशासाठी मागासवर्गीय माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा किती वर्षे आहे ?

१) ३८ वर्षे २) ४८ वर्षे ३) ४३ वर्षे ४) ४५ वर्षे

३) राज्य सेवा पूर्व परीक्षेसाठी अर्ज करताना उमेदवारांना किती परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे ?

१) अमागास रु.५०० मागासवर्गीय रु.३०० २) अमागास रु.७१९ मागासवर्गीय रु.४४९
३) अमागास रु.५४४ मागासवर्गीय रु.३४४ ४) यापैकी नाही

४) खालीलपैकी अचूक पर्याय निवडा :

अ) आयोगाच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करताना दरवर्षी दि. १ एप्रिल ते ३१ मार्च हा कालावधी विचारात घेण्यात येतो.
ब) आयोगाने दिलेल्या सल्ल्यानुसार कार्यवाही करणे शासनास बंधनकारक आहे.
क) आयोगाचा सल्ला शासनाने स्वीकारला नाही अशा प्रकरणाबाबतचा अहवाल राज्यपालांना सादर करणे आयोगास अनिवार्य आहे.

**पर्याय उत्तरे :**

१) फक्त अ आणि ब २) फक्त अ आणि क ३) अ, ब आणि क ४) फक्त ब

**0–0–0**

उत्तरे : महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा पेपर–१, ६ मार्च २०२२ (ए)

# मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान, योजना व शासनाशी संबंधित बाबी

## (१) सर्वसामान्य शब्दसंग्रह

१–४ २–२ ३–१ ४–२ ५–४ ६–२ ७–३ ८–२ ९–३

## २) वाक्यरचना

१–२ २–३ ३–४

## ३) व्याकरण

१–४ २–४ ३–३ ४–४ ५–३ ६–४ ७–४

## ४) म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग

१–३

## ५) उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे

१–३ २–२ ३–१ ४–४ ५–३

## 6) Common Vocabulary

1–1 2–2 3–2 4–2 5–3

## 7) Sentence structure

1–4 2–4 3–2 4–2 5–1 6–2

## 8) Grammar

1–1 2–3 3–1 4–2 5–1 6–2 7–3

## 9) Use of Idioms and phrases & their meaning

1-2 2-3

Study CIRCLE

## 10) Comprehension of passage

1-1 2-3 3-1 4-2

## ११) योजना व शासन : पायाभूत संरचना

१-२ २-३ ३-४ ४-३ ५-३ ६-४

## १२) अनुदान, केंद्रराज्य हिस्सा

१-१ २-४ ३-३ ४-४

## १३) लाभार्थी पात्रता

१-१ २-३ ३-२ ४-३ ५-२ ६–२ ७-२ ८-४ ९-२ १०-३

## १४) सामाजिक क्षेत्र

१-१ २-३ ३-३ ४-२ ५-४ ६-३

## १६) इतिहास

१-२ २-२ ३-३ ४-१ ५-३

## १७) भूगोल

१-२ २-१ ३-४ ४-४ ५-१

## १८) राज्यशास्त्र

१-१ २-३ ३-२ ४-३ ५-३

## १९) चालू घडामोडी

१-१ २-३ ३-२ ४-४

## २०) माहिती अधिकार २००५

१-४ २-४ 3-३ ४-२ ५-२



Study CIRCLE

उत्तरे : महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा पेपर-२, ६ मार्च २०२२ (ए)

# एमपीएससी / मंत्रालय येथील कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

## भारताचे संविधान

### १) मूलभूत अधिकार (कलम १२ ते ३०)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-१ | २-४ | ३-२ | ४-२ | ५-४ | ६-३ | ७-२ | ८-४ | ९-१ | १०-३ |
| ११-३ | १२-१ | १३-४ | १४-४ | १५-२ | | | | | |

### २) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे (कलम ३६ ते ५१)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १-२ | २-२ | ३-१ | ४-३ | ५-२ | ६-३ | ७-१ |

### ३) मूलभूत कर्तव्ये (अनुच्छेद - ५१ क )

| | | |
|---|---|---|
| १-२ | २-१ | ३-४ |

## महाराष्ट्र नागरी सेवा नियम

### ४) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-४ | २-३ | ३-३ | ४-१ | ५-२ | ६-१ | ७-३ | ८-३ | ९-२ | १०-२ |
| ११-२ | १२-४ | १३-३ | १४-३ | १५-४ | १६-३ | १७-३ | १८-१ | १९-४ | २०-४ |
| २१-२ | २२-४ | २३-१ | २४-१ | | | | | | |

### ५) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १-१ | २-३ | ३-३ | ४-१ | ५-२ | ६-४ | ७-४ | ८-४ | ९-४ | १०-३ |
| ११-२ | १२-१ | १३-३ | १४-३ | १५-३ | १६-२ | १७-३ | १८-३ | १९-२ | २०-३ |
| २१-२ | २२-१ | २३-२ | २४-३ | २५-३ | | | | | |

## मंत्रालयाच्या कामकाजासंबंधीचे घटक

## ६) संविधान भाग ६ – प्रकरण १ ते ४ (कलम १५२ ते २१३)

१–२ २–४ ३–४ ४–४ ५–३ ६–३ ७–४ ८–२ ९–३ १०–२
११–२ १२–३ १३–४ १४–४ १५–२

## ७) विधीमंडळ कामकाज

## ८) प्रशासकीय सुधारणा वा कल्याणकारी धोरणे/निर्णय

## ९) मंत्रालयातील कामकाजविषयक नियम व सूचना

१–३ २–२ ३–४ ४–२ ५–१ ६–१ ७–१ ८–२

## १०) मंत्रालयातील कार्यालयीन पद्धतीची नियमपुस्तिका

१–३ २–४

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक

## ११) संविधानातील लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद ३१५ ते ३२३

१–२ २–२ ३–१ ४–१ ५–३

## १२) एमपीएससी (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती विनियम), १९७१

१–१ २–२ ३–३ ४–४

## १३) एमपीएससीतील कार्यालयीन कार्यपद्धती

१–२ २–३ ३–३ ४–४ ५–१ ६–३

## १४) एमपीएससी व शासन दरम्यानच्या पत्रव्यवहार /कार्यनियमावली

१–१ २–४ ३–२ ४–२ ५–३ ६–३

## १५) एमपीएससीद्वारे प्रसिद्ध अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल

१–३ २–३ ३–३ ४–२

**This is the End of the Free Sample**

**To Enrol Click on the link below**

**https://www.studycircleonline.com/courses/asst-section-officer-departmental-exam-/45**